# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त-

**दिनांक- १५ डिसेंबर- २०१५**

# अनुक्रमणिका

**त्रिसदस्य समिती सर्वसाधरण सभा** **दि.१५.१२.२०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०५.३० वाजता**


| अ.नं. | विषय नं. | विषय | पान नंबर |
|---|---|---|---|
| | | **सभाकामकाज विभाग** | |
| १ | १ | दिनांक १०.११.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| २ | २ | दिनांक २८.११.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| | | **(अ) निविदा उघडून निर्णय घेण्याचे विषय-** | |
| | | **प्रकाशने विभाग** | |
| ३ | ३ | सन २०१६ चे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाईकामी संख्या निश्चित करुन ऑनलाईन ई-निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत. | ०१ |
| | | **(ब) प्रशासकीय मान्यतेचे विषय-** | |
| | | **आस्थापना विभाग** | |
| ४ | ४ | निवासासाठी संस्थान निवासस्थान मिळणेबाबत श्री ए.आर सोलापूरे सह दिवाणी न्यायधिश, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर राहाता यांचा दिनांक २५.११.२०१५ रोजीचा अर्ज | ०३ |
| ५ | ५ | शिर्डी महोत्सव २०१५ साजरा करण्यास व खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत | ०४ |
| | | **मंदिर विभाग** | |
| ६ | ६ | दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनानिमित्त होणा-या संचलनामध्ये श्री साईबाबांचे पालखीचा देखावा करणेबाबत. | ०५ |
| ७ | ७ | श्री शिर्डी साईबाबा टेंम्पल, रॉकीस, डेनवर, कोलोरॅडो (अमेरिका) येथील साई मंदिराचे आयोजित कार्यक्रमास जाणेसाठी परवानगी मिळणेबाबत. | ०६ |
| ८ | ८ | ऑस्ट्रेलिया मिशन ऑफ साई (ओमसाई) इनकार्पोरेटेड मेलबर्न येथील साई मंदिराचे आयोजित कार्यक्रमास जाणेसाठी परवानगी मिळणेबाबत. | ०६ |
| | | **कामगार विभाग** | |
| ९ | ९ | डॉ.अनिल विठ्ठलराव घरटे, सीएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि.०९.१२.२०१५ रोजीचे गैरशिस्त वर्तनाबाबत. | ०७ |
| | | **श्री साईबाबा हॉस्पिटल** | |
| १० | १० | संस्थान कर्मचा-यांचा जादा वैद्यकीय बीलांचा परतावा आदा करणे बाबत | ०९ |
| ११ | ११ | तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत. (माहे सप्टेबर- २०१५) | ११ |
| १२ | १२ | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील एम.आर.आय, सिटी स्कॅन विभागासाठी लेझर कॅमेरा फिल्म्स खरेदी बाबत. | १२ |
| १३ | १३ | श्री साईबाबा हॉस्पीटल मधील सेंट्रल मेडीकल गॅस प्लॅन्ट विभागाकरीत एअर कॉम्प्रेसर खरेदी करणे बाबत | १३ |
| १४ | १४ | श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये Casualty विभागाकरीता Dressing Trolly खरेदीबाबत. | १५ |
| | | **लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग** | |
| १५ | १५ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी सन २०१६-१७ करीता आवश्यक किराणा माल खरेदीबाबत. | १५ |
| | | **माहिती तंत्रज्ञान विभाग** | |
| १६ | १६ | श्री साईभक्तांसाठी Queue Management कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी वैष्णोदेवी देवस्थान कटरा (जम्मू )येथे कार्यप्रणालीची पहाणी करणेकामी प्रत्यक्ष भेट देणेबाबत. | १७ |
| १७ | १७ | साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link सुविधेकामी विविध Class –A-ISP पुरवठा धारकांकडून ई-निविदा मागविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणे बाबत . | १७ |

| अ.नं. | विषय नं. | विषय | पान नंबर |
|---|---|---|---|
| | | **पाणीपुरवठा विभाग** | |
| १८ | १८ | कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane sheet)करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदार मे.आर.के.सावंत नाशिक यांना कार्यादेश देणे बाबत व याकामी प्राप्त नामंजूर ई-निविदाधारकांची बयाणा रक्कम परत करणे बाबत. | १८ |
| १९ | १९ | संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत. | २१ |
| २० | २० | वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कनकुरी, पिंपळवाडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.राहाता पाणी आरक्षणासाठी भाग भांडवलाची रक्कम रु.१८४.०० कोटी मात्र शासनाकडून माफ होणेबाबत. | २१ |
| | | **आरोग्य विभाग** | |
| २१ | २१ | घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत शिर्डी शहरातील साफसफाईकरीता येणारा मासिक खर्च (अनुदान) मिळणेबाबत. | २३ |
| | | **बांधकाम विभाग** | |
| २२ | २२ | नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीकरीता खाजगी व महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे मालकीचे जागेत वाहनतळे विकसित करणेकामी तात्पूरत्या स्वरुपात घेतलेल्या जमिनीचे भाडेपट्टयाबाबत | २४ |
| २३ | २३ | नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीसाठी वाहनतळे विकसित करणेकामी वापरण्यात आलेल्या गौण खनिज स्वामित्व धनाची सुधारित दरानुसार होणारी फरकाची रक्कम आदा करणे बाबत | २९ |
| २४ | २४ | माहिती तंत्रज्ञान विभागाचे डेटा सेंटर हॉलमध्ये जिप्सन पार्टीशन तयार करुन मिळणेबाबत | ३२ |
| | | **लेखाशाखा** | |
| २५ | २५ | मौजे माळीण ता.आंबेगाव, पुणे येथे अतिवृष्टीमूळे गावावर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनामधील दुर्घटनग्रस्त व्यक्तींचे पूर्नवसन करणे बाबत | ३२ |
| २६ | २६ | सन २०१५ वर्ल्ड चॅम्पीयनशीप स्पर्धेकरीता अमेरिका सन सलवाडोर येथे जाणे-येणे व इतर कामी आर्थिक मदत मिळणेबाबत. | ३३ |
| | | **बगीचा विभाग** | |
| २७ | २७ | दुर्मीळ, मौल्यवान व मानवी आरोग्यासाठी उपयुक्त अशा औषधी वनस्पतींचे उद्यान करणेबाबत. | ३३ |
| | | **वाहन विभाग** | |
| २८ | २८ | दोन प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेबाबत. | ३४ |
| | | **मेकॅनिकल विभाग** | |
| २९ | २९ | अभिलेख कक्षाकरीता नवीन 4 नग स्प्लिट ए.सी.खरेदी करणेबाबत. | ३४ |
| **आयत्या वेळेचे विषय** | | | |
| | | **लेखाशाखा** | |
| ३० | ०१ | संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने GOLD MONETISATION SCHEME मध्ये गुंतविणेबाबत | ३५ |
| ३१ | ०२ | बी .जे.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे यांना Neonatal Intensive Care Unit (NICU) देणेबाबत. | ३६ |
| ३२ | ०३ | राजीव गांधी सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, दापोली, जिल्हा रत्नागीरी यांना सी.टी.स्कॅन युनिट सुरु करणेसाठी आर्थिक मदत देणे बाबत. | ३७ |
| ३३ | ०४ | ग्रामपंचायत देर्डे चांदवड, ता.कोपरगाव, जि.अ.नगर यांना सार्वजनिक शौचालय व स्नानगृह बांधुन देणेबाबत. | ३७ |
| ३४ | ०५ | मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत. | ३८ |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२२/ २०१५** | **दिनांक १५.१२.२०१५**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** | **वेळ- सायंकाळी ०५.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचीं सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १५.१२.२०१५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ /२०१५, दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १५.१२.२०१५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १०.११.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५८५** दिनांक १०.११.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक २८.११.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५८६** दिनांक २८.११.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०३** **सन २०१६ चे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाईकामी संख्या निश्चित करुन ऑनलाईन दरपत्रक (Commercial Bid) उघडणेबाबत..**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०४.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२४ नुसार श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१६ छपाईकामी येणा-या रक्कम रु.१,२२,९५,०००/- व निर्णय क्र.१२५ नुसार श्री साइ दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी येणा-या रक्कम रु.३,३५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३८ नुसार संस्थान प्रकाशित सन २०१६ चे डायरी/कॅलेंडर्स छपाई कामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेचे अधिन राहून विहित पद्धतीने ई निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार डायरी/ कॅलेंडर्स छपाईकामी ई-निविदा दि.२३.११.२०१५ ते दि.०२.१२.२०१५ या कालावधीत मागविण्यात आल्या आहेत.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचा दि.११.१२.२०१५ चा हुकूमनाम्यात श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका २०१६ ची छपाई करतांना दैनंदिनी व दिनदर्शिकेची संख्या मा.व्यवस्थापन समितीचे सभे निश्चित करुन घ्यावी व नंतर छपाई **करणेबाबत** आदेशीत केले आहे.

दैनंदिनी/ दिनदर्शिका २०१६ विक्रीचा कालावधी हा मार्च २०१६ पर्यंत असल्याने दैनंदिनी व दिनदर्शिका ह्या खालीलप्रमाणे निश्चित करुन छपाई करता येईल.

| अ.न. | तपशिल | मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१६.०४.२०१५ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आलेली संख्या | ऑनलाईन निविदा मागवितांना निश्चित केलेली संख्या | सध्या छपाई करावयाची निश्चित संख्या |
|---|---|---|---|---|
| **अ** | **ब** | **क** | **ड** | **इ** |
| १ | श्री साई दैनंदिनी | ३००००० | १,२०,००० | ९०,००० |
| २ | श्री साई दिनदर्शिका (एक पानी) १९"x२९" | ५००००० | १,५०,००० | १,३०,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री साई डिलक्स वॉल कॅलेंडर (८ पेजेस) आकार २२"x३५" | २५,००० | १०,००० | ७,००० |
| ४ | श्री साई थ्रीडी वॉल कॅलेंडर (७ पेजेस) आकार १९.२५"x२७.२५" | १०००० | ३,००० | २,००० |
| ५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर (सिंगल पेजेस) आकार १९"x२७" | ३००० | १,००० | १,००० |
| ६ | श्री साईबाबा थ्रीडी- ७ शिटर डेस्क कॅलेंडर, आकार ९.७५"x०७" | १५००० | ५,००० | ३,००० |

उपरोक्त तक्त्यातील कॉलम "इ" मध्ये सध्या छपाई करावयाची संख्या नमुद केली आहे.

आजचे सभेत मा.कार्यकारी अधिकारी यांनी मागील वर्षी सन २०१५ करीता छपाई करण्यात आलेल्या व विक्री करण्यात आलेल्या तसेच शिल्लक असलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकेची खालीलप्रमाणे माहिती सभेस दिली.

| अ.नं. | तपशिल | सन-२०१५ चा मंजूर दर प्रती नग रु. | विक्री दर | आदेशीत संख्या | विक्री संख्या | शिल्लक साठा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई दैनंदिनी २०१५ | ६६.०० | ७५/- | १,५०,००० | १,५०,००० | - |
| २ | श्री साई दिनदर्शिका (एक पानी) १९"x२९" | १५.३० | २०/- | ३,००,००० | ३,००,००० | - |
| ३ | श्री साई डिलक्स वॉल कॅलेंडर, (८ पेजेस) आकार २२"x३५" | २३४.०० | २५०/- | २०००० | २०००० | - |
| ४ | श्री साई थ्रीडी वॉल कॅलेंडर, (७ पेजेस) आकार १९.२५"x२७.२५" | २७९.०० | ३००/- | ९००० | ९००० | - |
| ५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर, (सिंगल पेजेस) आकार १९"x२७" | २३८.०० | २५०/- | ३००० | ३००० | - |
| ६ | श्री साईबाबा थ्रीडी- ७ शिटर डेस्क कॅलेंडर, आकार ९.७५"x०७" | २०७.०० | २२०/- | ११००० | ११००० | - |

यावर सभेने सन २०१६ करीता खालीलप्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेस मान्यता दिली.

| अ.न. | तपशिल | सध्या छपाई करावयाची निश्चित संख्या |
|---|---|---|
| १ | श्री साई दैनंदिनी | ७०,००० |
| २ | श्री साई दिनदर्शिका (एक पानी) १९"x२९" | १,३०,००० |
| ३ | श्री साई डिलक्स वॉल कॅलेंडर, (८ पेजेस) आकार २२"x३५" | ७,००० |
| ४ | श्री साई थ्रीडी वॉल कॅलेंडर, (७ पेजेस) आकार १९.२५"x२७.२५" | २,००० |
| ५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर, (सिंगल पेजेस) आकार १९"x२७" | १,००० |
| ६ | श्री साईबाबा थ्रीडी- ७ शिटर डेस्क कॅलेंडर, आकार ९.७५"x०७" | ३,००० |

तांत्रिक निविदेत पात्र असलेल्या खालील प्रेसधारकांचे ऑनलाईन दरपत्रक (Commercial Bid) आजचे त्रीसदस्य समिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

**श्री साईबाबा दैनंदिनी/दिनदर्शिका खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्री साई दैनंदिनी- २०१६ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१६ (आकार-१९"x२९") |
|---|---|---|---|
| | | निविदेमधील मुळ दर रु. | |
| १. | मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई | ७२.५० | १६.५१ |
| २. | मे.सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि.मुंबई | ७२.०० | - |
| ३. | मे.नीट प्रिंटर्स, अहमदनगर | ७५.०० | १८.७० |
| ४. | मनिपाल टेक्नॉलॉजी प्रा.लि.,मुंबई | ८१.०० | १६.१० |
| ५. | मे.सकाळ पेपर्स लि.,कोल्हापुर | ७२.०० | २८.०० |
| ६. | मे.चेरि ऑफसेट,सोलापूर | ७२.०० | <u>१५.९०</u> |
| ७. | प्रिंट प्लस प्रा.लि.मुंबई | <u>६६.१५</u> | १६.१० |

**श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर (८ पेजेस) आकार-२२"x३५" | श्री साईबाबा मॅटपॅट वॉल कॅलेंडर (७ पेजेस) आकार-१९.२५"x२७.२५" | श्री साईबाबा श्री डी वॉल कॅलेंडर (सिंगल पेज) आकार-१९"x२७" | श्री साईबाबा श्रीडी डेस्क कॅलेंडर (७ सिटर डेस्क कॅलेंडर) आकार-९.७५"x ७" |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील मूळ दर रु. | | | |
| १. | **मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि. मुंबई** | **२३४.००** | **२९३.००** | ४४०.०० | २६२.०० |
| २. | मे.सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि. मुंबई | २८९.०० | ३६८.०० | ४४९.०० | २७५.०० |
| ३. | मे.नीट प्रिंटर्स, अहमदनगर | - | - | - | - |
| ४. | मनिपाल टेक्नॉलॉजी प्रा.लि. मुंबई | - | - | - | - |
| ५. | मे.सकाळ पेपर्स लि. कोल्हापुर | २९५.०० | ३७६.०० | ४५८.०० | २८१.०० |
| ६. | मे.चेरि ऑफसेट, सोलापुर | ३०१.०० | ३८४.०० | ४६८.०० | २८७.०० |
| ७. | प्रिंट प्लस प्रा.लि.मुंबई | - | - | - | - |

**उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता, श्री साईबाबा श्रीडी वॉल कॅलेंडर (सिंगल पेज) आकार १९" x २७" व श्री साईबाबा श्रीडी ०७ शिटर, डेस्क कॅलेंडर, आकार ९.७५" x ०७" छपाईकामी मागील वर्षीच्या दरापेक्षा खुपच जास्त दर प्राप्त झालेले असल्यामुळे तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक मे.टॅको व्हिजन्स प्रा.लि., मुंबई यांना सदरहू दर कमी करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी उपरोक्त दोन्ही कॅलेंडर छपाईकामी मागील वर्षीच्या दरामध्ये १५% वाढ करुन छपाई करणेचे मान्य केले. तसे त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, अशी समितीने सूचना केली.**

श्री साईबाबा श्रीडी वॉल कॅलेंडर (सिंगल पेज) आकार १९" x २७" व श्री साईबाबा श्रीडी ०७ शिटर, डेस्क कॅलेंडर, आकार ९.७५" x ०७" छपाईकामीचे अंतीम दर खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि. मुंबई | | |
|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. | मागील वर्षीचा दर प्रती नग रु. | मागील वर्षीच्या दरामध्ये १५% वाढ करुन होणारा दर प्रती नग रु. |
| १. | श्री साईबाबा श्री डी वॉल कॅलेंडर (सिंगल पेज) आकार-१९"x२७" | ४४०.०० | २३८.०० | **२७३.७०** |
| २. | श्री साईबाबा श्रीडी डेस्क कॅलेंडर (७ सिटर डेस्क कॅलेंडर) आकार-९.७५"x ७" | २६२.०० | २०७.०० | **२३८.०५** |

निर्णय क्र.५८७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ चे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाईकामी उपरोक्त तुलनात्मक तक्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना त्वरीत कार्यादेश देण्यात यावा. विक्रीसाठी विहीत वेळेत आवश्यकता वाटल्यास याच मंजूर दराने प्रस्तावित श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिकांची वाढीव छपाई करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच सदरहू छपाईकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.०४ **निवासासाठी संस्थान निवासस्थान मिळणेबाबत श्री.ए.आर.सोलापुरे, सह दिवाणी न्यायाधीश, दिवाणी न्यायालय, क.स्तर.राहाता यांचा दि.२५/११/२०१५ रोजीचा अर्ज.**

प्रस्ताव- (अ) श्री.ए.आर.सोलापुरे, सह दिवाणी न्यायाधीश, दिवाणी न्यायालय, क.स्तर, राहाता यांनी दि.२५/११/२०१५ रोजीचे अर्जाने, निवासाकरीता ५०० रुमचे पाठीमागील संस्थानचे ०२ BHK निवासस्थान मिळणेची विनंती केलेली आहे. निवासस्थानाचे वापरापोटी संस्थानचे नियम व अटीप्रमाणे देय असलेले घरभाडे व इतर बाबी त्यांना मान्य आहेत.

**(ब)** शासकीय अधिका-यांना निवासाकरीता संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९८ व दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ मध्ये,

१. पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी.
२. मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी.
३. तहसिलदार, राहाता.
४. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी.
५. उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी.
६. पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा,शिर्डी पोलीस स्टेशन.
७. पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा.
८. राज्य गुप्तवार्ता अधिकारी.

या पदनामाच्या शासकीय अधिका-यांना शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ताव नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार संस्थानकडे जमा करणेचे अटीवर निवासासाठी उपलब्धतेनुसार संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच या पदनामाच्या अधिका-यांची इतरत्र बदली झाल्यास त्यांचेकडून त्वरीत संस्थान निवासस्थान खाली करुन घेण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन वेळोवेळी शासकीय अधिका-यांना संस्थान संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली असून, सध्या खालील पदनामचे शासकीय अधिकारी संस्थान निवासस्थानात राहत आहेत.

| अ.नं. | अधिकारी/ कर्मचारी | देण्यात आलेले निवासस्थान |
|---|---|---|
| ०१ | श्री.कुंदन सोनवणे, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी | साईसहवास ०१/०१ |
| ०२ | श्री.सुभाष दळवी, तहसिलदार, राहाता | साईसहवास ०२/०१ |
| ०३ | श्री.धैर्यशिल जाधव, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत | साईसहवास ०३/०३ |
| ०४ | श्री.विवेक पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी | साईसहवास ०४/०४ |
| ०५ | श्री.निलेश लहामगे, राज्य गुप्तवार्ता अधिकारी | साईध्यान ०२/३७ |
| ०६ | श्री.रमेश चंद्रभान बोरुडे, पोलिस कॉन्स्टेबल | साईध्यान ०२/४० |

यापुर्वी राहाता न्यायालयात कार्यरत असलेले दिवाणी न्यायधीश, श्री.वि.सा.गोसलवाड यांना दि.०८/०६/२००९ रोजीचे आदेशाने व सहदिवाणी न्यायाधीश श्री.समीद द.कामत यांना दि.१७/०६/२०१० रोजीचे आदेशाने शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार संस्थानकडे जमा करणेचे अटीवर निवासासाठी संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. परंतु आज रोजी कुठलेही ०२ BHK निवासस्थान रिक्त नाही.

**(क)** मध्यतरीच्या काळात श्री.संजय भा.काळे, मु.पो.कोपरगाव यांनी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये जनहित याचिका क्र.२५/२०१२ दाखल केलेली होती. त्यानुसार मा.शासनाचे दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्राने, 'श्री साईबाबा संस्थान निवासस्थानांचा गैरवापर' या मुद्दाबाबत, पुढीलप्रमाणे कळविलेले होते, अधिनियमात कोणतीही तरतूद नसूनही किंबहुना कीम १७(०३) नुसार स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्वपरवानगीशिवाय श्री साईबाबा संस्थानचे अधिकारी/ कर्मचारी वगळता अन्य कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांना दिलेली संस्थानच्या मालकीची निवासस्थाने तात्काळ संबंधितांकडून रिक्त करुन घ्यावीत. तसेच संबंधितांकडून घरभाडे भत्ता, विद्युत आकार, सेवा आकार इ. येणे असलेले सर्व रकमा एका महिन्यात वसूल करण्याची कार्यवाही कार्यकारी अधिकारी यांनी करावी. तसेच यापुढे संस्थानच्या अधिकारी/ कर्मचा-यांशिवाय अन्य कोणलाही निवासस्थाने कोणत्याही परिस्थितीत देण्यात येऊ नये. तसेच सदर सर्व कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करण्यात यावी व पूर्तता अहवाल राज्य शासनास सादर करण्यात यावा. तथापी, शासनाचे पत्रानुसार कार्यवाही पूर्ण न झाल्याने, सदर बाब याचिकाकत्याने मा.उच्च न्यायालयाच्या निर्दशानस आणून याप्रकरणी न्यायालयाचे चौकशी करण्याची विनंती केलली होती. त्यावर मा.न्यायालयाने, निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधिश यांचे मार्फत चौकशीचे आदेश देऊन याचिका खारीज केलेली आहे. सध्या याप्रकरणी निवृत्त न्यायाधीश यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

तरी उपरोक्त परिच्छेद **'ब'** व **'क'** मध्ये नमूद परिस्थितीस अनुसरुन श्री.ए.आर.सोलापुरे, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, राहाता यांना रिक्त होणारे ०२ BHK निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, याच आशयाची याचिका मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत असल्या कारणाने मा.श्री.ए.आर.सोलापुरे, सह दिवाणी न्यायाधीश, दिवाणी न्यायालय, क.स्तर. राहाता यांनी निवासाकरीता ५०० रुमचे पाठीमागे संस्थानचे 2 BHK निवासस्थान मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.०५** **शिर्डी महोत्सव- २०१५ साजरा करणेस व खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावी सदरचा दिवस श्रींच्या सानिध्यात जावा या उद्देशाने दरवर्षी ३१ डिसेंबरला भारतातून तसेच परदेशातून मोठया संख्येने साईभक्त शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. श्रींच्या दर्शनापासून कोणीही वंचीत राहू नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार समाधी मंदीर भक्तांना साईबाबांचे दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात येत असते. तसेच शिर्डी महोत्सव हा उत्सव सन २००४ पासून सुरु करण्यात आलेला आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री संस्थान परिसरात साईभजन,नृत्य,गायन इ.कार्यक्रमांचे आयोजीत केले जाते या कार्यक्रमासाठी विविध भागातून कलाकार कार्यक्रम सादरकरणेसाठी संस्थानकडे अर्ज करतात.

शिर्डी महोत्सव साजरा करणेसाठी संस्थान मार्फत साई भक्तांसाठी धार्मिक, सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

<u>अ) अंदाजपत्रक–</u> सन २०१४ चे शिरडी महोत्सवाकरीता झालेल्या व सन २०१५ चे शिर्डी महोत्सवासाठी अपेक्षित खर्चाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | श्री शिर्डी महोत्सव २०१४ | | श्री शिर्डी महोत्सव अंदाजे खर्च २०१५ |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी व स्टेज खर्च | ६०,०००/- | २५,०००/- | ३७,६००/- |
| २ | जाहिरात व बोर्ड खर्च | २५,०००/- | ३,४८०/- | १५,०००/- |
| ३ | कलाकार मानधन व प्रवास खर्च | ५०,०००/- | ७०/- | ५००.०० |
| ४ | इतर किरकोळ खर्च (मंदीर फुल सजावट, जादा कर्मचारी व इतर खर्च) | ३,२५,०००/- | ९६,३९४/- | ३,९९,९००/- |
| | एकूण खर्च | ४,६०,०००/- | १,२४,९४४/- | ४,५३,०००/- |

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/११/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९३८ अन्वये शिर्डी महोत्सव-२०१४ साजरा करण्यासाठी एकुण रु.४,६०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

**ब) कलाकार निश्चिती–** याही वर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सवासाठी दि.३१/१२/२०१५ रोजी निमंत्रीत गायकांचे व कलाकारांचे दि. ३१/१२/२०१५ रोजी भजन, गायन,नृत्य इ. कार्यक्रम आयोजीत करणे,निमंत्रित कलाकार यांचे मानधन निश्चीत करावे लागणार आहेत. कार्यक्रम मिळणेबाबत आलेल्या अर्जाचा तपशिलवार तक्ता अलहिदा सादर करण्यात येईल.

**क) कार्यक्रमाचे स्थळ-** मागील वर्षी साईनगर मैदानावर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी ही साईनगर मैदानावर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करता येईल.

शिर्डी महोत्सव- २०१५ साजरा करणेसाठी अंदाजे रु.४,५३,०००/- ( रु.चार लाख त्रेपन्न हजार) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी संस्थान मार्फत शिर्डी महोत्सव -२०१५ साजरा करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. ४,५३,०००/- खर्चास मान्यता मिळावी.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी महोत्सव- २०१४ मध्ये अंदाजे रु.४,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात रु.१,२४,९४४/- मात्र खर्च झालेला होता. सबब शिर्डी महोत्सव- २०१५ करीता रक्कम रुपये ३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-५)

---

विषय नं.०६ **दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनानिमित्त होणा-या संचलनामध्ये श्री साईबाबांची पालखीचा देखावा करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.सतिष शामलालजी गंगवाल, रा.शिर्डी यांनी दि.२६.११.२०१५ रोजीचे अर्जान्वये सन-२०१६ मध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथील संचलनामध्ये मागील वर्षी श्रीक्षेत्र पंढरपुर येथील देखावा करण्यात आला होता व यावर्षी श्रीसाईबाबांची पालखी व त्यांचा 'सर्व धर्म समभाव' व 'श्रद्धा-सबुरी' चा संदेश' असा देखावा करण्यासाठी महाराष्ट्र शासन व केंद्रीय स्तरावर प्रयत्न करावे असे कळविले आहे.

श्रीसाईबाबा भारतातील व भारताबाहेरील सर्व जाती व धर्माचे एकात्मतेचे प्रतिक म्हणून माणले जाते. त्यामध्ये श्रींचे समाधी मंदिर हे श्रीक्षेत्र शिर्डी येथे असल्याने हे भारतातील महाराष्ट्राचे एक लौकिक म्हणून ओळखले जाते. श्रीसाईबाबांचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीमार्फत प्रयत्न करण्यात येतात. प्रति वर्षी प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनाचे दिवशी विविध राज्यांमार्फत दिल्ली येथे राजपथावर त्या-त्या राज्याचे प्रतिनिधित्व करणारे चित्ररथ सादर करण्याची प्रथा आहे. मागील वर्षी महाराष्ट्र राज्यामार्फत 'पंढरीची वारी' या चित्ररथाचा देखावा करण्यात आला होता व त्यास पहिले पारितोषक मिळाले होते. तरी श्रीसाईबाबांचे अनेक साईभक्त आहेत. महाराष्ट्राचे भुषण म्हणुन श्रीसाईबाबांचा देखावा केल्यास श्रीसाईबाबांचा प्रचार व प्रसार होणार आहे. तरी त्याकामी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदर प्रस्ताव पर्यटन आणि सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे पाठवावा लागेल.

तरी श्रीसाईबाबांचा व त्यांचे विचारांचा प्रसार व प्रचार होणेकरीता सन-२०१६ मधील दि.२६जानेवारी, २०१६ रोजीचे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन त्यामध्ये श्रीसाईबाबांच्या पालखी मिरवणूकीचा चित्ररथ तयार करणेबाबतचा प्रस्ताव पर्यटन आणि सांस्कृतिक विभाग,महाराष्ट्र राज्याकडे पाठाविणेकामी मान्यता असावी, ही विनंती.

निर्णय क्र.५९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ मध्ये दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमीत्त होणा-या संचलनामध्ये करावयाचा श्री साईबाबांचे पालखीचा देखावा, इतक्या कमी कालावधीत करणे शक्य होणार नाही. यामुळे सन २०१७ मध्ये दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमीत्त होणा-या संचलनामध्ये श्री साईबाबांचे पालखीचा देखावा सादर करणेबाबत शासनास विनंती करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक ,मंदिर विभाग)

---

**विषय नं.०७** **श्री शिर्डी साईबाबा टेम्पल ऑफ रॉकीज, कोलेरॉडो, यु.एस.ए. येथील श्रीसाई मंदिराचे प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाकरीता जाणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री शिर्डी साईबाबा टेम्पल ऑफ रॉकीज, कोलोरॅडो, यु.एस.ए येथील श्रीसाई मंदिराचे चेअरमन डॉ. अजय झा यांनी दि.२६/०२/२०१६ ते दि.२८/०२/२०१६ अखेर कोलोरॅडो, यु.एस.ए येथील श्रीसाई मंदिराचे प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाच्या तारखा उपरोक्त ई-मेलद्वारे कळविल्या आहेत. तसेच सदर कार्यक्रमाकरीता त्यांनी संस्थानचे अधिकारी यांनी उपस्थीत रहावे व प्राणप्रतिसष्ठा करणेबाबत निमंत्रण दिलेले आहे.

श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबांचा प्रचार व प्रसार करणेसाठी सदैव प्रयत्नशील असते. श्रीसाईबाबांच्या प्रचारासाठी यापुर्वी चावडी शताब्दी महोत्सवानिमित्त अनेक यात्रेचे प्रयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भारतातील गोवा, नाशिक, लखनऊ, कॅलिंगपॉग इ. ठिकाणी श्रीसाईबाबांच्या पादुका दर्शनसोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सन-२०१७-२०१८ हे वर्ष श्रीसाईबाबांचे समाधी शताब्दी वर्ष आहे. या वर्षाचे पुर्वनियोजन करणेकामी श्रीसाईबाबांचा प्रचार व प्रसार करणे अतिशय महत्वाचे आहे. महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ चे नियम क्र.२१(१) नुसार समितीकडुन विश्वस्तव्यवस्थानिधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल असे आहे- त्यातील तरतूद (ड) नुसार श्रीसाईबाबांच्या शिकणीचा प्रचार करणे ही तरतूद आहे. यापुर्वीही श्रीसाईबाबांच्या प्रचाराकरीता यापुर्वी दि.१९ सप्टेंबर,२०१० रोजी लंडन येथे झालेल्या "साईभजनसंध्या" चे कार्यक्रमास जाणेसाठी तत्कालीन तीन मा.विश्वस्त, मा.श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी व एक पुजारी असे एकूण पाच व्यक्तींना संस्थान खर्चाने तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाने परवानगी दिलेली होती. त्याचप्रमाणे यावेळीही कोलोरॅडो, यु.एस.ए येथील चेअरमन यांचे निमंत्रण स्विकारुन श्रीसाईबाबांचे प्रचार व प्रसारासाठी संस्थानमार्फत अधिकारी व पुजारी यांना पाठविल्यास श्रीसाईबाबांच्या समाधी शताब्दी महोत्सवाच्या प्रचारात मदत होईल, असे नम्र मत आहे.

तरी श्री शिर्डी साईबाबा टेम्पल ऑफ रॉकीज, कोलोरॅडो, यु.एस.ए येथील श्रीसाई मंदिराचे दि.२६/०२/२०१६ ते दि.२८/०२/२०१६ अखेर श्रीसाई मंदिराचे प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाकरीता मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, मंदिर प्र.अधिक्षक व एक पुजारी यांना पाठविणेबाबत निर्णय व्हावा व यांकामी येणा-या खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.५९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री शिर्डी साईबाबा टेम्पल ऑफ रॉकीज, कोलोरॅडो, यु.एस.ए. येथील श्रीसाई मंदिराचे चेअरमन डॉ.अजय झा यांच्या विनंतीस मान देऊन, त्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास संस्थान अधिका-यांनी भेटी दिल्यास तेथील साईभक्तांना श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान बद्दल आत्मीयता वाढून अधिनियमातील तरतूदीनुसार श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार होण्यास निश्चितच मदत होईल. या कार्यक्रमास उपस्थित रहाणा-या संस्थान अधिका-यांचा सर्व खर्च श्री शिर्डी साईबाबा टेम्पल ऑफ रॉकीज, कोलोरॅडो, यु.एस.ए. हे करणार असल्यामुळे संस्थानवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच यापूर्वीचे व्यवस्थापन समिती सभेने मा.विश्वस्त, कार्यकारी अधिकारी व पुजारी यांना लंडन येथे झालेल्या "साईभजनसंध्या" कार्यक्रमास उपस्थित रहाणेस परवानगी दिलेली आहे.**

**या सर्व बाबींचा विचार करता, श्री शिर्डी साईबाबा टेम्पल ऑफ रॉकीज, कोलेरॉडो, यु.एस.ए. येथील श्रीसाई मंदिराचे प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमासाठी दि.२६.०२.२०१६ ते २८.०२.२०१६ अखेर कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, मंदिर अधिक्षक व एक पुजारी यांना यु.एस.ए. येथे जाणेस परवानगी देण्यात आली. परंतु कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी हे प्रतिनियुक्तीवर संस्थान सेवेत कार्यरत असल्यामुळे त्यांनी परदेशी जाणेसाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे उचित होईल, असे समितीस वाटते.**

**तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी श्री साईबाबा संस्थानने बाबांच्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये हाती घेतलेल्या प्रकल्पाबाबत स्लाईड शो दाखविण्यात यावा, जेणे करुन संस्थानचे देणगीमध्ये वाढ होईल, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८** **ऑस्ट्रेलिया मिशन ऑफ साई (ओमसाई) इनकार्पोरेटेड मेलबर्न येथील साई मंदिराचे आयोजित कार्यक्रमास जाणेसाठी परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** ऑस्ट्रेलिया येथील मिशन ऑफ साई (ओमसाई) इनकार्पोरेटेड मेलबर्न या मंदिराचे प्रेसीडेंट व फाऊंडर ट्रस्टी यांनी दि.१८/११/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे तेथील मंदिराचे दि.१४/१२/२०१५ ते दि.२२/१२/२०१५ अखेर आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थीत राहणेबाबत निमंत्रण दिलेले आहे. शिर्डी ते मेलबर्न (ऑस्ट्रेलिया) येथे जाणे-येणे तसेच निवासाची व्यवस्था ते स्वत: करणार असलेबाबत कळविलेले आहे.

यापुर्वी दि.१९ सप्टेंबर २०१०रोजी लंडन येथे झालेल्या "साईभजन संध्या" चे कार्यक्रमास जाणेसाठी तत्कालीन तीन मा.विश्वस्त, मा.श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी व एक पुजारी असे एकूण पाच व्यक्तींना संस्थान खर्चाने तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने परवानगी दिलेली होती.

तरी मेलबर्न (ऑस्ट्रेलिया) येथी साईमंदिराच्या दि.१४/१२/२०१५ ते दि.२२/१२/२०१५ अखेर होणा-या कार्यक्रमास मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, मंदिर अधिक्षक व एक पुजारी यांना पाठविणेबाबत मान्यता असावी तसेच याबाबत निर्णय व्हावा, ही विनंती.

निर्णय क्र.५९२ **सदरहू विषयावर चर्चा चालू असताना मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित कार्यक्रम काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलणेत आला असलेबाबतची माहिती सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑस्ट्रेलिया मिशन ऑफ साई (ओमसाई) इनकार्पोरेटेड मेलबर्न येथील साई मंदिराने आयोजित केलेल्या कार्यक्रमास संस्थान अधिका-यांनी भेटी दिल्यास तेथील साईभक्तांना श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान बद्दल आत्मीयता वाढून अधिनियमातील तरतूदीनुसार श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार होण्यास निश्चितच मदत होईल. तसेच या कार्यक्रमास उपस्थित रहाणा-या संस्थान अधिका-यांचा सर्व खर्च ऑस्ट्रेलिया मिशन ऑफ साई (ओमसाई) इनकार्पोरेटेड, मेलबर्न हे करणार असल्यामुळे संस्थानवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच यापूर्वीचे व्यवस्थापन समिति सभेने मा.विश्वस्त, कार्यकारी अधिकारी व पुजारी यांना लंडन येथे झालेल्या "साईभजनसंध्या" कार्यक्रमास उपस्थित रहाणेस परवानगी दिलेली आहे.**

**याकरिता ऑस्ट्रेलिया मिशन ऑफ साई (ओमसाई) इनकार्पोरेटेड मेलबर्न हे ज्या वेळेस कार्यक्रमाचे आयोजन करतील त्यावेळेस कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, मंदिर अधिक्षक व एक पुजारी यांना पाठविणेत यावे. या सर्व बाबींचा विचार करता, श्री शिर्डी साईबाबा टेम्पल ऑफ रॉकीज, कोलेरॉडो, यु.एस.ए. येथील श्रीसाई मंदिराचे प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमासाठी दि.२६.०२.२०१६ ते २८.०२.२०१६ अखेर कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, मंदिर अधिक्षक व एक पुजारी यांना यु.एस.ए. येथे जाणेस परवानगी देण्यात आली. परंतु कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी हे प्रतिनियुक्तीवर संस्थान सेवेत कार्यरत असल्यामुळे त्यांनी परदेशी जाणेसाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे उचित होईल, असे समितीस वाटते.**

**तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी श्री साईबाबा संस्थानने बाबांच्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये हाती घेतलेल्या प्रकल्पाबाबत स्लाईड शो दाखविण्यात यावा, जेणे करुन संस्थानचे देणगीमध्ये वाढ होईल, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक ,मंदिर विभाग)

---

विषय नं.०९ **डॉ.अनिल विठ्ठलराव घरटे, सीएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि.०९.१२.२०१५ रोजीचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

प्रस्ताव- श्री. विरेन प्रविण गाला, मुंबई यांनी डॉ. अनिल घरटे यांचे विरुध्द दि. ०९.१२.२०१५ रोजीचा तक्रार अर्ज सादर केला आहे. त्यात त्यांनी, "माझे नातेवाईक जयेश सोनी यांना दि. ०९.१२.२०१५ च्या मध्यरात्री २ वाजता श्वसनाचा त्रास झाला असता मी आपल्या दवाखान्यात ॲडमिट केले. सदर कॅज्युल्टीमधील आर. एम. ओं. नी व्हेन्टेलेटर लावणेस सांगीतले. मी नकार दिला व आमचे पेशंट आपल्या कार्डीआक अम्ब्युलन्समधुन परत नेण्याचे सांगीतले असता आपले आर. एम. ओ. नी यांनी हे पेशंट नाशिकमध्ये घेऊन जा. तेथे तुम्हांला चांगली व्यवस्था आहे. आम्ही विरोध केला असता आमच्याशी आर. एम. ओ. घरटे यांनी आरेरावी केली.

आम्ही पेशंट नाशिक येथे नेण्यास तयार झालो असता शिर्डीमधुन २-३ किलोमीटर पुढे गेल्यानंतर आम्हांला वोकार्ड हॉस्पिटलमध्ये जायचे सांगितले असता डॉ. घरटे यांनी त्यांच्या शिटा खालील ऑक्सीजनचा पाईप काढून टाकला. दुस-या हॉस्पिटलमधील कमिशनच्या मोहापाई सदर डॉक्टर माझया नातेवाईकाच्या जिवाशी खेळला. श्री साईबाबांच्या नावाने चालणा-या हॉस्पिटलला अशाप्रकारे कलंकीत करणा-या डॉक्टर विरुध्द आपण योग्य कार्यवाहीकरावी ही विनंती," असे म्हटलेले आहे.

त्यास अनुसरुन डॉ. अनिल विठ्ठलराव घरटे यांना दि. ११.१२.२०१५ रोजीचे पत्रान्वये नोटीस देण्यात आली आहे. त्यात "श्री. विरेन प्रविण गाला, मुंबई यांनी दि. ०९.१२.२०१५ रोजी त्यांचे नातेवाईक श्री. जयेश सोनी या रुग्णाला श्री साईबाबा हॉस्पिटल रुग्णालयामधून मुंबई येथे रेफर करताना झालेल्या घटने संबंधित तक्रार अर्ज इकडीलकार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तरी याबाबत सदरचे मिळताच झालेल्या घटनेबा स्पष्ट लेखी खुलासा त्यांचेकडून दोन दिवसांचे आत इकडील कार्यालयास सादर करावा अन्यथा एकतर्फा योग्य तो निर्णय घेण्यात येईल." असे नमूद केले आहे.

त्यास अनुसरुन डॉ. घरटे यांनी दि. १४.१२.२०१५ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यात त्यांनी दि. ०९.१२.२०१५ रोजी मी डॉ. घरटे ए. व्ही. अपघात विभागातरात्रपाळी डयुटीवरहोतो. त्यावेळी एक रुग्ण नामे जयेश सोनी हा अपघात विभागात आला. He was a k/c/o CKD & DM & he was severing breathless मी त्वरीत त्याला Bipap Ventilation वर घेतले व Enditracheal intubation करुन Ventilator वर घेण्याची गरज कदाचित पडू शकेल असे रुग्णाच्या नातेवाईकांना सांगितले. सुदैवाने पेशंट Bipap वरच स्थिर (stable) झाला मी पेशंटचा पेपर काढून त्यावर नोट्स टाकल्या व डॉ. देसाई (Physician) यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविले. डॉ. देसाई यांनी मला सांगीतले कि, आता आय सी यु मध्ये Bed होऊ शकणार नाही, रुग्णात त्वरीत दुस-या हॉस्पिटलला रेफर करा, मी रुग्णांच नातेवाईकांना बोलावून घेवून परिस्थिति सविस्तर समजावून सांगीतली.

मी (डॉ. घरटे)- हे बघा रुग्णाची स्थिती गंभीरआहे त्यालाआय सी यु मध्ये ॲडमिट करण्याची आवश्यकता आहे. परंतु आपल्या हॉस्पिटलमध्ये Bed उपलब्ध नसल्याने रुग्णास दुस-या हॉस्पिटलमध्ये shift करायला हवे.

श्री.विरेन गाला (पेशंटचे नातेवाईक)- डॉक्टर, आम्ही मुंबईवासी आहोत, आम्ही पेशंट मुंबईला घेवून जातो.

मीः हे पहा, मुंबईला जाण्यासाठी ५-६ तास लागतात. पेशंटच्या जीवीताच्या दृष्टीने मुंबईला जाणे धोक्याचे आहे. तरी तुम्ही पेशंटला PMT Loni येथे अगर नाशिकला न्या. अगोदर पेशंटला stable होऊ द्या. मग मुंबईला निवांतपणे घेऊन जा.

श्री. विरेन गालाः डॉक्टर, आम्हांला बाकी काहीही सांगु नका. आम्हांला पेशंटला मुंबई येथेच न्यायचे आहे.
मीःहे बघा ॲम्ब्युलन्स जरी असली तरी त्यामध्ये Bipap वरचा पेशंट मुंबईच्या ५-६ तासाच्या प्रवासातसुस्थितीत सांभाळणे फार जोखमीचे काम आहे. कोणत्याही क्षणी पेशंट Bad होवु शकतो व त्याला Ventilator लागु शकते. शिवाय ॲम्ब्युलन्सच्या काही मर्यादा आहेतच की, ॲम्ब्युलन्स म्हणजे हॉस्पिटलचे ICU नव्हे, जिथे आपण काहीही करु शकतो. म्हणून शक्य तेवढया जवळच्या हॉस्पिटलमध्ये लवकरात लवकर पेशंटला पोहोचविण्याचे काम आपल्याला केले पाहिजे, या सर्व गोष्टी आपल्याला स्टप्टपणे समजावुन सांगणे हे माझे काम आहे व ते मी करीत आहे. अर्थात अंतिम निर्णय तो तुम्हांलाच घ्यायचा आहे.

माझ्या बोलण्यावर नातेवाईकांनी बराच वेळ विचार केला व मला म्हणाले.

श्री. विरेश गाला ठिक आहे. एकंदरीत विचार करीता तुमचेच म्हणणे योग्य वाटते. या स्थितीत मुंबईला जाणे नक्कीच धोक्याचे आहे. पीएमटी लोणीला नको. पण नाशिकला जायला काहीही हरकत नाही.

मीः Okey Nice Decision

श्री. विरेश गालाः पण सर, नाशिकला कुठे न्यायचे?

मीः नाशिकमध्ये इंट्री करातांना जे सुरुवातीलाच हॉस्पिटल लागले, तेथे पेशंटला ॲडमिट करुन मोकळे व्हायचे.

श्री. विरेश गालाःपण नेमके कुठल्या हॉस्पिटलला जायचे?

मीः काही काळजी करु नका, नाशिक रोडला म्सूनिसीपाल्टीचे बिटको हॉस्पिटल आहे, जयराम हॉस्पिटल आहे, मल्टीकेअर हॉस्पिटल आहे, अशी अनेक हॉस्पिटल आहेत. आपण कोठेही पेशंट ॲडमिट करु शकतो.

श्री. विरेश गालाः ओ. के.

पेशंट ब-यापैकी Stable झाल्यावर पेशंटला कार्डीॲक ॲम्ब्युलन्समध्ये घेतले. या निमित्ताने मी आपणाला सांगु इच्छितो की, आपल्या ॲम्ब्युलन्समध्ये Bipap साठीचा NIV मोड नाही. त्यानंतर पेशंटला PUP केले. Bipip लावले व CMV मोडवर टाकले. ॲम्ब्युलन्स सुरु झाली. पेशंटचे नातेवाईक मला म्हणाले, आता आम्हाला आमचा पेशंट वोकार्ड हॉस्पिटलला न्यायचा आहे.

मीः अहो, वोकार्डला नेण्यासाठी आपल्याला सुमारे ८-१० कि. मी. पुढे जावे लागेल. तुम्ही अनावश्यक जोखीम (Risk) का घेत आहांत. ?

श्री. विरेश गालाः डॉक्टर, आम्हांला आमचा पेशंट वोकार्डलाच न्यायचा आहे.

मीः ओ. के. जशी आपली इच्छा.

पुढे २-३ कि. मी. अंतर गेल्यावर पेशंट Restless झाला. He was not comfortable. I immediately asked the driver to take the ambulance back to the hospital. I observed that ventilator was not working. I immideately attached O2 tubing to the ambu-bag & went on ventilating the pt c amvubag. Within 5 minutes, we reached the hospital took the pt to casualty, applied bipap support, fully ventilated & stabilised the pt. I felt very happy to see that the pt was stable.

नंतर डॉ. जैन यांना विनंती करुन त्यांचा ICU मधील एक पेशंट CRU-I मध्ये शिफ्ट करुन घेतला, डॉ. देसाई यांना तसे कळविले व पेशंटचे ICU मध्ये ॲडमिशन करुन घेतले. असो.

येणेप्रमाणे पेशंटच्या हिताच्या दृष्टीने जे जे करायला हवे, ते ते सर्व मी केले आहे. यात पेशंटच्या नातेवाईकांनी जे आरोप केले आहेत, ते खोटारडे, घाणेरडे, बेजबाबदार व अतिशय निंदनीय स्वरुपाचे असुन त्यात मुळीच तथ्य नाही. खाजगी हॉस्पिटलकडुन कमिशन घेतो, त्यासाठी पेशंटचा O2 supply बंद करुन त्याच्या जिवाशी खेळणे असला घाणेरडा विचार आमचे मनात येणे सुध्दा शक्य नाही, कृती करण्याची गोष्ट तर दुरच राहिली. अहो, मी एक डॉक्टर असुन पेशंटला जिवदान देणे हे माझे आद्य कर्तव्य आहे. रुग्णसेवा हिच ईश्वर सेवा हे मला पक्के माहित आहे. हया भावनेतूनच मी परत हॉस्पिटलला आणले, त्याला casualty मध्ये stabilize केले, व मोठया प्रयत्नाने ICU मध्ये Bed करुन त्याला ॲडमिट करुन घेतले.

सर, येणेप्रमाणे हा खुलासा मी सादर करीत आहे, तो मान्य व्हावा ही विनंती." असे म्हटलेले आहे.

सदरचे खुलाशा सोबतचे दि. १४.१२.२०१५ रोजी श्री. सचिन तांबे, शिर्डीव इतर ११ गांवकरी यांनी श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील दलाली करणा-या डॉक्टर्सवर कारवाई होणेबाबत निवेदन दिलेले असुन त्यात त्यांनी, "साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील अनेक तक्रारी यापुर्वी आल्या आहेत, परंतु आत्ता पर्यंत कुठलिही कार्यवाही झालेली नाही.

आपल्या हॉस्पिटलमधील डॉ. घरटे व डॉ. शामकुवर हॉस्पिटलमध्ये बेड शिल्लक असतांना पेशंटला व नातेवाईकांना घाबरुन देवुन तुमचे पेशंट सिरीयस आहे, त्यांना तातडीने नाशिकला हालवावे लागेलअशा प्रकारे दबाब

टाकून या डॉक्टरांना जिथे दलाली (कमिशन) मिळते अशाच हॉस्पिटलमध्ये नेण्याचा आग्रह करतात. व खाजगी ॲम्ब्युलन्समध्ये नेण्यास भाग पाडतात.

नुकताच अतिशय गंभीर प्रकार घडला तो आपण वर्तमानपत्रातुन वाचलात असाल व त्याची तक्रार पण झाली आहे. जयेश सोनी नावाच्या पेशंटला व नातेवाईकांना घाबरुन त्यांना डॉक्टर कमीशन मिळणा-या हॉस्पिटलला नेण्यास भाग पाडले. परंतु रस्त्यात त्यांना (नातेवाईकांनी) नकार दिल्यावर डॉ. घरटे यांनी O2 (ऑक्सिजन)पाईपच काढल्याची गंभीर घटना घडली. सुदैवाने बाबांच्या कृपेने पेशंट वाचले परंतू आपल्या कमीशनसाठी जर डॉक्टरांनी असे कृत्य केले असेल तर ही गोष्ट अतिशय गंभीर आहे.

तसेच डॉ. शामकुवर देखील अशाच प्रकारे कमीशनसाठी बाहेर पाठवितात अशा अनेक तक्रारी आहेत.

तरी या दोघांनाही तातडीने निलंबीत करुन डॉक्टर घरटे यांच्यावर पोलीसात तक्रार करावी अन्यथा सदर प्रकरणात तातडीची कार्यवाही न झाल्यास होणा-या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी आपणावर असे म्हटलेले आहे.
गैरवर्तनाबाबत दोषी असलेल्या कर्मचा-यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनीयम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय, किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे,

(४) वेतनवाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचा-याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचा-याच्या समयश्रेणीतील वेतनश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो, तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचा-याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी, पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाजेष्ठतेतून घट झाली त्या स्थानात किंवा सेवाजेष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही

**मोठया दंडात्मक कारावाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षीस म्हणून कायदेशिर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाचा कर्मचा-याचे कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ् स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षादेणेची तरतूद आहे.

सबब, प्र. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी डॉ. घरटे यांचे दि. १४.१२.२०१५ रोजीचे लेखी खुलाशाबाबत दिलेला स्पष्ट अभिप्रायाचे अवलोकन करता डॉ. अनिल विठ्ठलराव घरटे, सी.एम.ओ., श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी केलेला खुलासा असमाधानकारक असल्याचे म्हटले आहे तसेच दि. १४.१२.२०१५ रोजी श्री. सचिन तांबे शिर्डीव इतर ११ गांवकरी यांनी श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील दलाली करणा-या डॉक्टर्सवर कारवाई होणेबाबत निवेदन दिलेले असुन डॉ. शामकुवर देखील अशाच प्रकारेकमीशनसाठी बाहेरपाठवितात अशा अनेक तक्रारी आहेत. तरी या दोघांनाही तातडीने निलंबीतकरुन डॉक्टर घरटे यांच्यावर पोलीसात तक्रार करावी अन्यथा सदर प्रकरणात तातडीची कार्यवाही न झाल्यास होणा-या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी आपणावर असे म्हटलेले आहे. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये काही दिवसांपासुन या घटनेबाबत बातम्या/ निवेदने येत असुन यामुळे संस्थानची बदनामी होवुन नावलौकीकास बाधा निर्माण झालेली आहे. यामुळे संस्थान प्रशासन व रुग्णालयाविषयी साईभक्त व रुग्णांमध्ये गैरसमजुतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

तरी डॉ. घरटे यांचे दि. ०९.१२.२०१५ रोजीचे गैरशिस्तवर्तणुकी संबधीत करावयाचे शिक्षेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.अनिल विठ्ठलराव घरटे, सीएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि.०९.१२.२०१५ रोजीचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना तात्पुरते सेवा निलंबीत करण्यात येऊन त्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी, कामगार विभाग)

---

विषय नं.१० **जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक** – खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी–**

१) **श्री.यादव माधव कोते, विभाग संरक्षण, हुद्दा – पहारेकरी**

श्री.यादव माधव कोते यांची आई कोते चंद्रभागा ह्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ.किरण भागवत, फिजीशियन यांच्याकडे अंतर्रुग्ण म्हणून उपचार घेत होते. परंतू सदर रुग्णांची प्रकृतीमध्ये सुधारणाहोत नसल्यामुळे तसेच रुग्ण हे वयोवृध्द असल्यामुळे तसेच त्यांनी डॉ.भागवत यांचेकडे बाहेरील शताब्दी हॉस्पीटल, नाशिक येथे जाण्याची मागणी केली. त्यामुळे डॉक्टरांनी अग्रहाखातर शताब्दी हॉस्पीटल, नाशिक येथे जाण्याची परवानगी दिली. कोते यांनी शताब्दी हॉस्पिटल येथे अंतर्रुग्ण म्हणून उपचार घेऊन तेथील खर्चापोटीचे बीले परतावा मिळणेकामी सादर केलेली आहे. परंतू सदर हॉस्पिटल हे संस्थानच्या मान्य यादीत नाही. तरी याबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

२) **श्रीमती आशा तुळशीराम रोकडे- विभाग- श्री साईनाथ रुग्णालय, हुद्दा- परिचारीका**

श्रीमती आशा तुळशीराम रोकडे यांचे पती तुळशीराम लक्ष्मण जाधव यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमधील व्हीजीटींग किडणी विकार तज्ञ डॉ.जयेश वाघुळदे यांचेकडे उपचार सुरु होते. डॉ. वाघुळदे हे आठवडयातुन एकदाच दर बुधवारी संस्थानच्या रुग्णालयामध्ये येत असतात. सदर रुग्ण अचानक आजारी पडले असता त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलमधील डॉ.रश्मी इंगळे यांना दाखविले असता त्यांनी त्यांच्यावर उपचार सुरु असलेले डॉ.वाघुळदे यांचे New Satyam Hospital & Critical Care Centre, Nashik उपचारासाठी पाठविले होते. तेथे त्यांच्या खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार केले . तसेच त्यांच्या संदर्भीय अर्जान्वये त्यांनी वैद्यकीय बिलाच्या परतावा मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सदर रुग्णाचे उपचार हे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हीजीटींग डॉ.जयेश वाघुळदे यांचेकडे सुरु होते. त्यामुळेसदर रुग्णास त्याच डॉक्टरांकडे उपचार करावा असा डॉ.इंगळे यांनी अभिप्राय दिलेला आहे. सदर हॉस्पिटल संस्थानच्या मान्य यादीत नाही.

३) **श्री.संजय रामदास राऊत, विभाग- कॅन्टीन, हुद्दा- मदतनीस**

श्री.संजय रामदास राऊत यांचे वडील रामदास भागवत राऊत हे आजारी असतांनी त्यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉ.मयुर म्हात्रे, न्युरो सर्जन यांना दाखविले असता त्यांना Spondylesis (Gr- I Listhesis L4 Over L5 with Bilat LL (L.S.R.) Rediculopathy with LCS L4-5) ह्या आजाराने त्रस्त होते. सदर रुग्णाचे ऑपरेशन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये होत होते, असे डॉक्टरांचे मत होते. परंतू रुग्णाच्या नातेवाईकांमुळे घरच्यांच्या अग्रहाखातर त्यांनी रुग्णास रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे उपचार करण्यास डॉ.मयुर म्हात्रे यांच्याकडे आग्रह केला असे डॉक्टरांचे म्हणने आहे.

श्री.राऊत यांनी रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे घेतलेल्या उपचारांचा बीलाचा परतावा मिळणेकामी बीले सादर केलेली आहे. सदर बीलाबाबत कर्मचा-यास प्रत्यक्षाअंती डॉ.मयुर म्हात्रे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी त्यांच्या रेफर लेटरवरती रुग्णाच्या आग्रहानुसार त्यांनी रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे घेण्यास भाग पाडले. परंतू सदर हॉस्पिटल हे संस्थानच्या मान्य यादीत आहे. तरी याबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

४) **श्री.रणशुर चंद्रकांत जयवंत, विभाग-बांधकाम हुद्दा- सल्लागार कंत्राटी पध्दतीने**

श्री.रणशुर चंद्रकांत जयवंत हे संस्थानच्या कंत्राटी पध्दतीने मानधनावर काम करीत होते. त्यांना Rediculopathy / Lumber (Spondylysis) या आजाराने त्रस्त होते. त्यांनी संस्थानमधील डॉ. प्रितम जपे यांना दाखविले असता पुढील उपचारासाठी संस्थानच्या मान्य यादीतील सुजता बिर्ला हॉस्पिटल, नाशिक येथे पाठविणेत आले. (दि.३०.०६.२०१४ रेफर लेटरव्दारे ) तेथे गेल्यावर त्यांनी हॉस्पीटलमध्ये जागा शिल्लक नाही व त्याच दिवशी आम्ही नाशिकमधील खाजगी रुग्णालयात दि.०४.०६.२०१४ ते १४.०६.२०१४ पर्यंत अंतर्रुग्ण म्हणून उपचार घेतले. त्यानंतर मे ते जुलै असे तीन महिन्यानंतर त्यांनी दि.३१.०७.२०१४ रोजी औरंगाबादच्या मॅक्स सुपर स्पेशालिटी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले असून सदर हॉस्पिटल हे संस्थानच्या मान्य यादीत नाही. तसेच त्यांच्याकडे भरपुर वेळ असतांनी त्यांनी संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये जाऊन उपचार घेणे आवश्यक होते. तसेच सदर रुग्णालय हे राहात्या ठिकाणापासून दुरचे होते. तसेच त्यांनी आजाराचे स्वरुप बघता संस्थानच्या मान्य यादी जाणे आवश्यक होते. परंतू त्यांनी त्यांच्या सोईनुसार खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले आहे. श्री.रणशुर यांनी घेतलेल्या उपचाराची बीले परतावा मिळणेकामी सादर केली असून त्यांच्या अर्जात वरील बाबी नमुद केल्या आहे. तसेच ते आजारी पडल्यानंतर घरीच होते व नंतर तीन महिन्यानी खाजगी रुग्णालयात जाऊन वैद्यकीय उपचार घेतले आहे. तरी याबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.यादव माधव कोते, विभाग संरक्षण, हुद्दा – पहारेकरी | आई | Diabeties, Blood Pressure | डॉ.किरण भागवत | शताब्दी हॉस्पीटल, नाशिक | ४९६२७.०० | ३९७०२.०० |
| २ | श्रीमती आशा तुळशीराम रोकडे विभाग- श्री साईनाथ रुग्णालय, हुद्दा- परिचारीका | पती | Diabeties, Blood Pressure | डॉ. वाघुळदे डॉ.रश्मी इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३००८८.०० | २२९१८.०० |

| अ.नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | श्री.संजय रामदास राऊत, विभाग- कॅन्टीन, हुद्दा- मदतनीस | स्वतः | Spondylysis | डॉ.मयुर म्हात्रे, | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १८७९८०.०० | १८४४६०.०० |
| ४ | श्री.रणशुर चंद्रकांत जयवंत, विभाग-बांधकाम हुद्दा- सल्लागार कंत्राटी पध्दतीने | स्वतः | Rediculopathy / Lumber (Spondylysis) | डॉ. प्रितम जपे | मॅक्स सुपर स्पेशालिटी, औरंगाबाद | १२८१०१.०० | १०२४८१.०० |
| | | | | | एकूण- | ३९५७९६.०० | ३४९५६९.०० |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –**

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीचे पुढील निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.५९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित कर्मचा-यांनी वैद्यकीय देखभाल नियमावलीस अनुसरुन संस्थानने मान्य केलेल्या रुग्णालयांमध्ये उपचार घेतलेले दिसून येत नाही व त्यांनी मागणी केलेली बीलांची रक्कम नियमावलीमधील तरतूदीनुसार देय्य होत नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

**तसेच संस्थान कर्मचा-यांच्या जादा वैद्यकिय बीलांचा परतावा आदा करणेकामीची नियमावली सन- १९९९मध्ये तयार करण्यात आलेली असून महाराष्ट्र शासनाकडील निर्णयांस अनुसरुन सदरहू नवीन अद्ययावत नियमावली बनविणेत यावी व यापुढे संस्थान कर्मचा-यांच्या जादा वैद्यकिय बीलांचा परतावा आदा करणेबाबतचा प्रस्ताव दर तीन महिन्यानंतर व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.११ **तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (माहे – सप्टेंबर २०१५)**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र. २५४ अन्वये वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. १,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बिले अदा करणेत यावी व रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा.त्रिसदस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र. ३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणा-या रुग्णांसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदीकरुन द्यावे असे ठरले आहे.

३) मा.व्यवस्थापन समिती सभा, दि. २६/०३/२०११ निर्णय क्र. २५४ अन्वये वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. १,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बिले अदा करणेत यावी व रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

४) मा.त्रिसदस्य समिती सभा, दि. १७/०४/२०१५ निर्णय क्र. ३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंर्तरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणा-या रुग्णासाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

५) मा.त्रिसदस्य समिती सभा, दि. ०९/१२/२०१४ निर्णय क्र. १०२१ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा तातडीचे औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी रक्कम रु. १,५०,०००/- मात्र ऐवजी रु. ३,००,०००/- मात्र करणेस मान्यता देण्यात आली.

<u>प्रास्ताविक</u>– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरिता सर्जिकल मटेरियल, औषधे, केमिकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरियल औरंगाबाद येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे/ केमिकल्स/ सर्जिकल साहित्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते त्यासाठी रु. ४९५०/- मात्र खर्च आलेला आहे. सदर खरेदी ही माहे सप्टेंबर मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. ३,००,०००/- चे तरतुदी व्यतिरिक्त रक्कम रु. ४९५०/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-



| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs | Requirment |
|---|---|---|---|---|---|
| 01. | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 3172 | 16/09/2015 | 4950.00 | Saibaba Hospital |
| | **Total Amt. in Rs.** | | | **4950.00** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:–** राजीव गांधी योजनेतंर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात. त्यानुसार सदर खरेदी करुन बिले अदा करावयाची आहे. तरी नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे सप्टेंबर- २०१५ मध्ये तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील एम. आर. आय., सिटी स्कॅन विभागासाठी लेझर कॅमेरा फिल्मस् खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१२-१३ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमध्ये M/s. Fujifilm India Pvt. Ltd.,Mumbai यांचेकडून CR Capsula System Model XL II – १ No. & Laser Camera (Model Dry Pix 7000 Three Tray) - 2 No. अंदाजे किंमत 17,00,000/- देणगी स्विकारुन पुढील तीन वर्षाकरीता त्यासाठी लागणा-या फिल्म्स निश्चित केलेल्या दरानूसार खरेदी करण्यास तसेच मशिनचा व कॅमेराचा ३ वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेनंतर दरवर्षी ४% CMC Charges on equipment value अधिक Services tax वेगळा at actual स्विकारुन सदरची नविन १ नग CR Capsula System Model XL II व १ नग Laser Camera (Model Dry Pix 7000 Three Tray) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये बसविण्यात येऊन एक नग Laser Camera (Model Dry Pix 7000 Three Tray) श्री साईबाबा रुग्णालयात सी.टी.स्कॅन व एमआरआय मशिनला बसविण्यात आले. दि.१५/०८/२०१५ रोजीचे मा.त्रि.सदस्य समिती सभेत निर्णय क्र.७२० अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार M/s. Fujifilm India Pvt. Ltd.,Mumbai यांना इकडील पत्र क्र.७१२० दि.२६/११/२०१२ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता . पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार त्यांचेकडून करारनामा करुन घेण्यात आलेला होता. सदर पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार त्यांचे पुरवठा आदेशाचा कालावधी दि.२६/११/२०१५ रोजी संपणार आहे.

एम.आर.आय., सिटी स्कॅन व एक्स-रे साठी लागणारे फिल्म्स साठी रुग्णालयाचे सन २०१५-१६ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमध्ये तीन निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. no. | Item Description | Qty. | Rate Per in Rs (Incl of all Taxes) | Rate Per in Rs (After Discount) | Make | Brand Name | Technical Description | Packing | Generic & Branded |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | DI-HL FILMS 35 / 43CM 100 FILMS PACKET. ( 14" X 17") DEMAND IN PKT. | | | | | | | | |
| 1 | Uma Marketing Agencies | 1000 | 8500.00 | 7400.00 Rate per Film– 74.00 | AGFA Health care | DI-HL | DDI Technology | 1 x 100 Film | Branded |
| 2 | M/s. Fujifilm India Pvt. Ltd., Mumbai | 1000 | 9239.39 | 8777.42 Rate per Film – 87.77 | Fujifilm | DI-HL | Dry Laser Film | 100 Film / Pkt | Branded |
| 3 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 1000 | 9878.75 | 9878.75 Rate per Film – 79.03 | Carestream | DVB | DVB | 125 Film / Pkt | Branded |
| B | DI-HL FILMS 100 FILMS PACKET. ( 11" X 14") DEMAND IN PKT. | | | | | | | | |
| 1 | M/s. Fujifilm India Pvt. Ltd., Mumbai | 20 | 8818.19 | | Fujifilm | DI-HL | Dry Laser Film | 150 Film / Pkt | Branded |
| 2 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 20 | 6388.72 | | Carestream | DVB | DVB | 125 Film / Pkt | Branded |

| C | DI-HL FILMS 100 FILMS PACKET. ( 8" X 10") DEMAND IN PKT. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Fujifilm India Pvt. Ltd.,Mumbai | 200 | 4500.00 | | Fujifilm | DI-HL | Dry Laser Film | 150 Film / Pkt | Branded |
| 2 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 200 | 3292.44 | | Carestream | DVB | DVB | 125 Film / Pkt | Branded |
| | | | | | | | | | |

उपरोक्त निविदाधारकांनी आणखी काही नविन सवलती देखील दिलेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| निविदा धारकाचे नाव | देऊ केलेल्या सवलती |
|---|---|
| Uma Marketing Agencies | AGFA Drystar AKYS Printer on Parmanent Demo Basis.CMC Free |
| Fuji Film India Pvt Ltd, | DP Plus Printer free of cost, Free of cost CMC to our existing CR and Printers Installed at Sainath Hospital and Saibaba Hospital for next 5 year, Free service Inculding Maintannance and spare parts (CMC Inculding Consumables like Cassettes / Screen /Compouters) |
| Siddhi Medical Distr., Aurangabad | Vita Flex CR System, Dryview 6950 Three tray printer 2 Nos for Demo Purpose & Maintenance of the equipment including parts Free |

उपरोक्त दरामध्ये Fuji Film कंपनीपेक्षा इतर कंपन्याचे दर हे कमी आलेले आहे तसेच त्यानी काही नविन सवलती देखील दिलेल्या आहेत. DVB film 8x10 व 11x14 करिता M/s. Fuji Film व M/s. Siddhi Medical, Aurangabad या दोन पुरवठाधारकांना आदेश देण्यात आलेला होता. तसेच DVB film 14x17 करिता M/s. Fuji Film या एकमेव पुरवठाधारकांला पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. DVB film 8x 10 व 11x 14 करिता M/s. Siddhi Medical Aurangabad यांचेकडून निम्नतम दराने film खरेदी करता येतील. उपरोक्त प्रस्तावामध्ये Fuji film कंपनीबरोबर झालेल्या करारानुसार दि.२६/११/२०१५पर्यंत संस्थानला सदरील film, M/s. Fuji film यांचेकडून खरेदी करणे बंधनकारक असल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र जाधव साहेब यांनी तोंडी आदेश दिलेले होते की, M/s. Fuji Film कंपनीचा पुरवठा आदेशाचा कालावधी संपण्यापूर्वी उपरोक्त प्रस्तावावर योग्य निर्णय होण्याकरिता उपरोक्त विषय हा मा. त्रिसदस्य समिती सभपुढे ठेवण्यात यावा.

उपरोक्त कराराच्या कालावधी संपलेनंतर पुढील कालावधीकरिता आवश्यक असणारे DVB 14x17 film चा पुरवठा आदेश देणेकामी खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध आहे.

अ) सदर फिल्म्स खरेदीकामी प्राप्त तीन निविदाधारकांना मा. त्रि. सदस्य समिती सभेपूढे बोलवून उपरोक्त फिल्म्सकरीता नव्याने निम्नतम दर घेण्यात येऊन निर्णय होणेस

किंवा

ब) दोन्ही रुग्णालयाकरीता लागणा-या फिल्म्स खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास

किंवा

क) उपरोक्त बाबत योग्य तो निर्णय होणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.५९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील एम. आर. आय., सिटी स्कॅन विभागासाठी आवश्यक असलेले लेझर कॅमेरा फिल्मस् Fuji film कंपनीबरोबर झालेल्या करारानुसार दि.२६/११/२०१५ पर्यंत त्यांचेकडून खरेदी करणेत याव्यात व त्यानंतर वैद्यकिय तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने प्रस्तावात नमुद केलेल्या निम्नतम दरधारकांकडून खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.१३ **श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडिकल गॅस प्लॅंट विभागाकरिता एअर कॉम्प्रेसर खरेदी करणेबाबत**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध एकूण ६ ऑपरेशन थिएटर्स, एकूण ४ सी. आर. यु., जी. आय. सी. यु आणि आय. सी. सी. यु. तसेच विविध वॉर्डस करिता सन २००५ यावर्षी सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांचेकडून एकूण रु. २७,५१,६८८/- इतक्या रकमेत बसवून घेण्यात आली आहे. सदर सिस्टीमच्या मेडिकल गॅस प्लॅंट मध्ये एकूण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ. विविध ॲक्सेसरीजसह बसविणेत आले आहेत.

मेडिकल गॅस प्लॅंट मध्ये एकूण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ. मशिनरी बसविणेत आले पासुन (६ वर्षापासून) २४ तास सतत सुरु असतात. ऑपरेशन थिएटर्स व आय. सी. सी. यु. येथे अत्यवस्थ

रुग्णांना कृत्रीम श्वासोच्छवास देणेसाठी व्हेंटिलेटर्स करीता एअर कॉम्प्रेसर द्वारे कॉम्प्रेसड एअरचा पुरवठा पाईपलाईन द्वारे केला जातो. त्यामुळे सदर कॉम्प्रेसरवर कामाचा बोजा हा खूपच वाढलेला आहे.

सध्या ऑक्सिजन प्लँटमध्ये दोन कॉम्प्रेसर आहेत. त्यापैकी एक Kirloskar कंपनीचा कॉम्प्रेसर असुन तो सन २००५ या वर्षात खरेदी केलेला आहे. तो सध्या खराब झालेला असुन कंपनीने त्याचे उत्पादन देखील बंद केलेले आहे, त्यामुळे बाजारात त्याचे स्पेअर पार्टस् उपलब्ध होत नाहीत. त्यानंतर २०१२ मध्ये Screw Type 15 HP क्षमतेचा एक कॉम्प्रेसर खरेदी केला होता. सध्या सदर कॉम्प्रेसरवर पुर्ण लोड आहे. तो जर ऐनवेळेस बिघडला तर मोठी अडचण निर्माण होईल, त्यामुळे एक पर्यायी (Stand By) त्याच मॉडेलचा कॉम्प्रेसर खरेदी करणे गरजेचे आहे असे बायोमेडिकल विभागाचे म्हणणे आहे त्यामुळे बायोमेडिकल विभागाने (Oxygen Plant) दि. १८/०४/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये नवीन 15 HP क्षमता असलेल्या Compressor एक नगाची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम करीता एक नवीन एअर कॉम्प्रेसर तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पेशंटची संख्या व त्या अनुषंगाने व्हेंटिलेटर्स ची संख्या सन २००५ पेक्षा दुप्पटीपेक्षा अधिक प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे नवीन एअर कॉम्प्रेसर हा १५ एच. पी. क्षमतेचा घेणे योग्य राहील. १५ एच. पी क्षमतेच्या एअर कॉम्प्रेसर (सर्व अॅक्सेसरीज सह) करीता अंदाजे खर्चाकरिता M/s. Almed Equipments, Mumbai यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदकामी अंदाजे रक्कम रु. ३,६५,६२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र. ७२५ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडिकल गॅस प्लँट विभागाकरिता एअर कॉम्प्रेसर खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ३,६५,६२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या

वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नसून, मुंबई कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1) | M/s . Al. Med. Equipmut, Navi Mumbai | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे खरेदीकामी एक निविदा प्राप्त झाली आहे. परंतु, खरेदीकामी कमीत – कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे दिनांक १०/१२/२०१४ मंजूर टिप्पणीन्वये फेर निविदा मागविण्यास मान्यता मिळाली. त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात ही फ्री प्रेस जनरल मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश – पुणे दिव्यमराठी – नाशिक पुण्यनगरी – औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानच्या संकेतस्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती तसेच एकूण ७२ पुरवठा धारकांना ई – मेलव्दारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले.

निविदा विक्रीची मुदत दिनांक ११/०५/२०१५ ते २५/०५/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती. तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दिनांक २७/०५/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात तीन निविदा प्राप्त झालेल्या असून मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1) | M/s .Datta Enterprises, Ahmednagar | 30/05/2015 |
| 2) | M/s . PPC, Poonam Pneumatic, Pune | 01/06/2015 |
| 3) | M/s .Parkeen Brothers, Mumbai | 01/06/2015 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या तीन तांत्रिक सिलबंद निविदा वैद्यकीय संचालक यांचे समोर दि. ०३/०८/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांच्या तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त तीनही निविदाधारकांच्या दिनांक १५/०९/२०१५ रोजी ऑनलाईन कमर्शियल उघडण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यानंतर दि. २०/०९/२०१५ रोजी ऑनलाईन डिजीटल सिगनेचरची मुदत संपल्यामुळे सदर खरेदीकामी पुन्हा निविदा मागविणे आवश्यक आहे.

परंतु, यापूर्वी सेंट्रल मेडिकल गॅस प्लँट येथे एक १५ एच पी क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर filter System सन २०१२ मध्ये खरेदी करण्यात आला होता. त्यावेळी आपलेकडे उपलब्ध असलेल्या जुने एअर कॉम्प्रेसरचे टँक

त्याकरिता वापरण्यात आले त्यामुळे आता नवीन कॉम्प्रेसर खरेदी करतांना यापूर्वी खरेदी करतांना कॉम्प्रेसरची filter System व टॅंक वापरता येईल त्यामुळे फक्त एअर कॉम्प्रेसरची खरेदी करण्याची आवश्यकता आहे.

त्यानुसार एअर कॉम्प्रेसर १५ एच पी क्षमता (Flooer mounted with out filter System and without tank) करिता नव्याने दर मागविले असता, M/s. Atlas Copco यांचे अधिकृत M/s. Datta Enterprises यांनी रु. २,५०,२३०/- इतक्या खर्चाचे ई – मेलव्दारे पत्र पत्र क्र. DE/15/16/4090 Dt 11/09/2015 रोजी कळविले आहे.

उपरोक्त खर्च हा ३०००००/- पेक्षा कमी असल्यामुळे ई – निविदा मागविण्यची आवश्यकता नाही.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटल मधील १५ एच पी क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. २,५०,२३०/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.५९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडिकल गॅस प्लॅंट विभागाकरिता आवश्यक असलेला १५ एच पी क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,५०,२३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.१४ **श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये Casualty विभागातील Dressing Trolly खरेदीबाबत.**

प्रस्ताव श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty विभागासाठी Dressing Trolly ची दि. ०१/०७/२०१५ चे मागणी पत्रान्वये मागणी केली आहे. सदर Dressing Trolly चा वापर हा तेथे ॲडमिट असणारे रुग्ण उदा ॲक्सीडेंट पेशंटचे Dreessing करण्यासाठी सदर Dressing Trolly चा वापर होतो.

उपरोक्त खेदीकामी अंदाजे खर्चासाठी Divine Health Care यांचेकडून दुरध्वनीद्वारे दरपत्रक मागविण्यास आले आहे. त्यानूसार दि. २०/१०/२०१५ चे ई-मेल पत्रद्वारे त्यांनी सदर Dressing Trolly चे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per In Rs. | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Dreesiing Trolly 1000mm Lx510mm Wx1000mm H Shelf Approx.Size: 760mm Lx510 mm wStainless Steel Tubular Frame Work mounted on 200mm Dia. Heavy-Duty castor. Upper S.S.top Fitted with four side railing Down side detachable S.S. Finish matt. | 02 | 23625.00 | 47250.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **47250.00** |

उपरोक्त Dressing Trolly खरेदीकामे अंदाजे रु.४७२५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी** – श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty विभागासाठी Dressing Trolly ची (औषध भांडार या विभागात प्राप्त दि. ०९/०७/२०१५) अन्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty या विभागात Dressing Trolly शिल्लक नसल्यामूळे खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी उपरोक्त Dressing Trolly हे विहीत कोटेशन मागवुन खरेदी करण्यास तसेच याकामी येणा-या रक्कम रु.४७२५०/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.५९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये Casualty विभागातील Dressing Trolly विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४७,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.१५ **लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी सन २०१६-१७ करीता आवश्यक किराणा माल खरेदीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१)(घ)** साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना प्रसादरुपी मोतीचूर लाडू विक्री तसेच मंदिर दर्शनरांगेत भक्तांना मोफत बुंदी पाकीटे वाटप करण्यात येतात. सदरचे मोतीचूर लाडू तसेच बुंदी तयार करण्याचे काम लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत करण्यात येत आहे. त्यासाठी लागणारा कच्चे मटेरियल (हरबरा दाळ, गावरान तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची जिलेबी रंग) हे संस्थानचे मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. खरेदी केलेले मटेरियल हे मध्यवर्ती भांडारकडून दैनंदिन गरजेनुसार

घेऊन लाडू व बुंदी निर्मितीचे काम करण्यात येते. सन 2016-2017 (एप्रिल 2016 ते मार्च 2017) या कालावधी करिता खालीलप्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल (जात/प्रकार/कंपनी) | सन २०१६-१७ साठी निव्वळ मागणी (क्विंटलमध्ये) | अंदाजे दर (क्विंटलमध्ये) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | साखर- (३० MM) स्पेशल. | १५५०० | २७२१ | ४,२१,७५,५००/- |
| २ | हरबरा दाळ- (स्टोनलेस व वाळलेली, अनपॉलीशड्) | ९५०० | ५५१७ | ५,२४,११,५००/- |
| ३ | गावरान तुप गाईचे, ॲगमार्क- FSSAI, १५ कि.ग्रॅ.डबा पॅकिंग | १०००० | ३१९०० | ३१,९०,००,०००/- |
| ४ | काजू पाकळी- (दोन पाकळी, वाळलेली) | २५० | ५४४०० | १,३६,००,०००/- |
| ५ | खिसमीस- (बदामी/लाल) | २५० | २८००० | ७०,००,०००/- |
| ६ | हिरवी विलायची- (बोल्ड वाळलेली) | ४० | ८४,००० | ३३,६०,०००/- |
| ७ | जिलेबी रंग- मार्सन, Three Leaves (synthetic food colour/ Lemon Yellow powder) ISI Mark | ०३ | १४९९९ | ४४,९९७/- |
| ८ | ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी ३ रंगात प्रिन्टींगसह साईज ६" x ७" GSM- 70 | ११०० | १३८०० | १,५१,८०,०००/- |
| ९ | मोतीचूर लाडू प्रसाद पेपर रोल छपाईसह साईज- ८.५" x ४" Poster- 60 GSM L.D.Coating- 25 G.S.M. Total GSM- 85 GSM, Paper Roll Size - 204 M.M. | ११०० नग रोल (प्रती २०० मिटरचा रोल) | १८०० | १९,८०,०००/- |
| १० | बुंदी प्रसाद पेपर रोल छपाईसह साईज- ५" x ४" Poster- 60 GSM L.D.Coating- 25 G.S.M. Total GSM- 85 GSM, Paper Roll Size- 204 M.M. | ३२०० नग रोल (प्रती २०० मिटरचा रोल) | १८००/- प्रति रोल. | ५७,६०,०००/- |
| ११ | प्लॅस्टीक ट्रे P.V.C. (Food Grade) 100 -120 मायक्रॉन 150 m.m. लांबी, 25 m.m. रुंदी, 50 m.m. जाडी | ०१ कोटी नग | ०१.५० प्रती नग | १,५०,००,०००/- |
| | **अंदाजे एकूण रक्कम रुपये-** | | | **४७,५५,११,९९७/-** |

**विभागाचा अभिप्राय-** लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी आवश्यक असलेला किराणा माल संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी विभागामार्फत टप्या- टप्प्याने खरेदी करणेस तसेच त्याकामी येणा-या अंदाजे एकूण रक्कम रु. ४७,५५,११,९९७/- खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

**मागणी-** तरी सन २०१६-१७ (एप्रिल 2016 ते मार्च 2017) या कालावधी करिता किराणा माल खरेदीकामी मान्यता असावी, ही विनंती.

सदरहू खरेदीकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सादर, मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲपलीकेशन सादर करता येईल.

**निर्णय क्र.५९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी आवश्यक असलेला किराणा माल संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी विभागामार्फत टप्या- टप्प्याने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे एकूण रक्कम रु. ४७,५५,११,९९७/- खर्चास मान्यता देण्यात आली.**

**परंतु सदरहू खरेदी करणेपूर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/ प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१६** **श्री साईभक्तांसाठी Queue Management कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी वैष्णवदेवी देवस्थान, कटरा (जम्मु) येथे कार्यप्रणालीचे पाहणी करणेकामी प्रत्यक्ष भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. 20/08/2015 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार व दि. 28/10/2015 रोजीची मंजुर टिपणी अन्वये तिरुपती देवस्थान, तिरुमला येथे M/s.Trilok Security Systems India Limited, यांनी कार्यान्वीत केलेल्या Queue Management मधील दर्शन पास, दर्शन रांगेतील सेवा सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आलेली आहे. तसेच सदरकामी वरिष्ठांनी दिलेल्या निर्देशानुसार M/s.Trilok Security Systems India Limited, यांनी त्याच धर्तीवर कार्यान्वीत केलेल्या Queue Management मधील दर्शन पास, दर्शन रांगेतील सेवा-सुविधा वैष्णवदेवी देवस्थान, कटरा (जम्मु) येथे पाहणी करणे आवश्यक असल्याचे सुचित केले आहे.

त्यानुसार वैष्णवदेवी देवस्थान, कटरा (जम्मु) याठिकाणी M/s.Trilok Security Systems India Limited, यांनी कार्यान्वीत केलेल्या Queue Management कार्यप्रणालीची पाहणी करणेसाठी मा. कार्यकारी अधिकारी सो., मा.उप-कार्यकारी अधिकारी सो., यांचेसह मा. उपकार्यकारी अभियंता श्री रघुनाथ आहेर सो., व प्र. माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख श्री किशोर गवळी यांना वैष्णवदेवी देवस्थान, कटरा (जम्मु) येथे भेट देण्यासाठी जाणे-येणेक मुंबई ते जम्मु विमान प्रवास भाडयास तसेच स्थानिक प्रवास, नाष्टा-जेवण, राहणेकामी इत्यादीकामी येणाऱ्या खर्चापोटी श्री किशोर साहेबराव गवळी प्र. माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख यांचे नावे रोख रक्कम रुपये 60,000/- मात्र ॲडव्हान्स आवश्यक आहे. परंतु, सदर ॲडव्हान्स रोख रक्कम रुपये 60,000/- घेणेकामी प्रथम मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे.

तरी, श्री साईभक्तांसाठी M/s.Trilok Security Systems India Limited, यांनी कार्यान्वीत केलेल्या Queue Management कार्यप्रणालीची पाहणी करणेकामी वैष्णवदेवी देवस्थान, कटरा (जम्मु) येथे उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जाणे-येणेकामी होणाऱ्या खर्चापोटी श्री किशोर साहेबराव गवळी प्र. माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख यांचे नावे रक्कम रुपये 60,000/- (अक्षरी- साठ हजार) मात्र ॲडव्हान्स रोखीने मिळणेबाबत संस्थानचे लेखाशाखा विभागास आदेश होणेस प्रस्ताव दि. 21/11/2015 रोजी सादर करण्यात आला होता. परंतु, सदर प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी, असे निर्देश दिले आहे. त्यानुसार सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे M/s.Trilok Security Systems India Limited, यांनी श्री साईभक्तांसाठी कार्यान्वीत केलेल्या Queue Management कार्यप्रणालीची पाहणी करणेकामी वैष्णवदेवी देवस्थान, कटरा (जम्मु) येथे रेल्वेने जाणेस परवानगी देण्यात आली.**

**त्यांना जाणे-येणेकामी येणा-या खर्चाच्या बीलांचा परतावा नियमाप्रमाणे देण्यात यावा. तसेच याचवेळी शिर्डी साई ग्लोबल फाऊन्डेशन, नोएडा (उत्तर प्रदेश) येथे डॉ.चंद्रा भानु सतपथी यांचे मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आलेल्या ग्रंथालयासही भेट देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link सुविधेकामी विविध Class-A- ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रं..799 2) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 47.

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांना ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी इत्यादी सुविधा श्री साईभक्तांसाठी online.sai.org.in या संकेतस्थळावर सुरु करण्यात आलेल्या आहेत. देश- विदेशातील श्री साईभक्तांना सदर सेवेचा लाभ घेणेसाठी संस्थानचे शिरडी येथील ऑनलाईन वेबसाइट सर्व्हरला बीएसएनएल यांचे इंटरनेट लिंकव्दारे कनेक्ट व्हावे लागते.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 47 नुसार बीएसएनएल, शिरडी यांचेकडुन Primary 10 Mbps इंटरनेट सेवा OFC व्दारे दि. 28/07/2015 रोजीचे कार्यादेशानुसार दि. 12/02/2015 ते दि. 13/02/2016 पर्यंत घेण्यात आलेली होती. सदर सेवेचा कालावधी दि. 13/02/2016 रोजी संपुष्टात येत असल्याने, साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांसाठी कार्यरत असलेल्या ऑनलाईन सेवेसाठी नव्याने Primary 10 Mbps Internet Link OFC/RF व्दारे पुढील दोन वर्षाकरीता घेणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने Class-A-ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,95,000/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन सद्यस्थितीतील वापरात असलेली बीएसएनएलची लिंकचा कालावधी संपुष्टात येणेचे अगोदर पुढील दोन वर्षाकरीता नविन Class-A-ISP पुरवठाधारकांकडुन संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रियेव्दारे निम्नत्तम निविदाधारकास कार्यादेश देता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेनुसार सद्यस्थितीतील Primary 10 Mbps बीएसएनएल लिंकचा कालावधी दि. 12/02/2016 रोजी संपुष्टात येत असल्याने याकामी पुढील दोन वर्षाकरीता Primary 10 Mbps लिंक OFC/RF व्दारे घेणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने Class-A-ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागविणेस व याकामी

येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,95,000/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी, प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे सद्यस्थितीतील Primary 10 Mbps बीएसएनएल लिंकचा कालावधी दि. 12/02/2016 रोजी संपुष्टात येत असल्याने याकामी पुढील दोन वर्षाकरीता Primary 10 Mbps लिंक OFC/RF व्दारे घेणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने Class-A-ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागविणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,95,000/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.६०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Primary 10 Mbps Internet Link सुविधा घेणेकामी येणारा अंदाजे रु.९,९५,०००/- मात्र खर्च कशाच्या आधारावर निश्चित केला, याच्या तपशीलासह सविस्तर फेरप्रस्ताव त्वरीत सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.१८ **कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Sheet) करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदार मे.आर.के.सावंत, नाशिक यांना कार्यादेश देणेबाबत व याकामी प्राप्त नामंजुर ई-निविदा धारकांची बयाना रक्कम परत करणेबाबत.**

प्रस्ताव **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियम कलम 21 मधील पोट-कलम (1) च्या खंड (क) अन्वये " मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-**

1. मा.व्यवस्थापन समितीचे दि. 12/04/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 285 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून, कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Fabrics) करणेकामीच्या प्रस्तावित कामांसाठी तसेच याकामी येणा-या अंदाजे रु. 10.65 कोटी मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येवून मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपिठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी असे ठरले."

2. मा.व्यवस्थापन समिती सभा दि. 20/11/2014 आयत्या वेळचा विषय नं. 01, निर्णय क्रं. 1019

मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.

(2) मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.12/04/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 285 अन्वये कनकुरी येथील साठवण तलावामध्ये Geomembrane Fabrics करणेकामीच्या प्रस्तावित कामांसाठी तसेच याकामी येणा-या अंदाजे रु. 10.65 कोटी मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येवून, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी,असे ठरलेले आहे.

येत्या उन्हाळयात गंभीर पाणी टंचाई निर्माणहोण्याची शक्यता आहे व गोदावरी उजव्या तट कालव्यातून पिण्याचे पाण्यासाठी किती आवर्तन मिळतील याबाबत निश्चिती झालेली नाही. त्यामुळे मा.खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर काम सुरु करणेस विलंब होवू नये, लगेचच कामांस सुरुवात करता यावी, याकरीता सदरहू कामी मा.खंडपीठाचे मान्यतेस अधिन राहून वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविण्यात याव्या व मा. खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतरच संबंधीताना कार्यादेश देण्यात यावा. तसेच सदर कामांमध्ये रफ शहाबादी फरशीचे काम समाविष्ट असून त्यामुळे काम पुर्ण होण्यास विलंब होणार असल्याने व ही बाब वगळल्यास खर्चातही बचत होणार आहे. याकरीता सदर बाब वगळून सुधारित एस्टिमेट तयार करावे व त्यानुसार निविदांची मागणी करण्यात यावी,असे ठरले.

3. मा.व्यवस्थापन समितीचे दि.16/04/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 115 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होवून, कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrance Sheet) करणेकामी उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपिठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा आदेश:-**

1. सिव्हील ॲप्लिकेशन नं. 5818/2014, दि. 14/01/2015 रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

Head. Perused the resolution of the committee dated 12.04.2014. The applicant has already advertised the tender as per the resolution and has received bids. The applicant is now permitted to take further steps for steps for finalizing the contract. But, before awarding the contract, the petitioner shall take permission of the Court. This Civil Application is kept pending.

2. सिव्हील ॲप्लिकेशन नं. 5818/2014, दि.06/05/2015 रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

1. Vide this Application, the Applicant seeks permission to spend the amount for the purpose of Canvass Proofing.

2. This Court on 14th January 2015 had allowed the Applicant to advertise the tender as per the resolution and also permitted to take further steps for finalizing the contract. It was stated that before awarding contract, the Petitioner shall take permission of the Court. The Applicant has received three tenders. The lowest is of R.K. Sawant, Civil Contractor, Nashik for an amount of Rs. 3,51,86,896/-.

3. Mr. Talekar, learned counsel for the quality of work verified.

4. As R.K. Sawant, Civil Contractor, Nashik is the lowest, we permit the Applicant to award tender for the purpose of Canvass Proofing at three water reservoirs located at Kankuri. The Applicant shall see that the quality of work is adhered and shall get the work certified through a Government recognized engineer.

**प्रस्तावना:-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि. 20/11/2014 चे रोजीचे सभेतील निर्णयानुसार इकडील विभागामार्फत निविदा व ई-टेंडर नोटीस तसेच नव्याने किमान पात्रता निकष (Minimum Qualifying Criteria) तयार करुन, दि. 04 मार्च, 2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये याकामी परत एकदा वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर फेर (Third Call) जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरहू ई-निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 17/03/2015. |
| 2) | Tender document download start date: | 17/03/2015 from 11:00 Hrs. |
| 3) | Tender document download end date: | 24/03/2015 upto 17:00 Hrs. |
| 4) | Pre-bid meeting date: | 19/03/2015 at 11:00 Hrs. |
| 5) | Bid submission start date: | 20/03/2015 from 11:00 Hrs. |
| 6) | Bid submission closing date: | 24/03/2015 upto 17:00 Hrs. |
| 7) | Technical bid hard copy submission date: | 26/03/2015 upto 17:00 Hrs. |
| 8) | Bid opening date (Technical & Commercial): | 30/03/2015 at 11:00 Hrs. (If possible) |

वरील तपशिलानुसार कनकुरी येथील साठवण तलावामध्ये कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Fabric Sheet) टाकणे या कामांबाबत दि. 19/03/2015 रोजी 11:00 वाजता शिर्डी येथील संस्थानचे सभागृहात मा.प्रशासकिय अधिकारी यांचे उपस्थितीत प्री-बीड मिटींग घेण्यात आली. त्यावेळी उपस्थित असलेल्या इच्छुक ठेकेदारांनी निविदेतील अटी व शर्तीबाबत उपस्थित केलेल्या शंकांबाबत चर्चा करण्यात आली. त्यास अनुसरुन Common Set of Deviations इच्छुक ठेकेदारांचे माहितीसाठी ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. उपरोक्त कामी विहीत मुदतीत खालील 03 निविदाधारकांचे Envelope No.01 (Technical Bid) hard copies मध्ये प्राप्त झालेले होते.

| Sr.No. | Name of Contractor | Inward No | Date |
|---|---|---|---|
| 1) | R.K.Sawant, Civil Contractor, Nashik. | 024465 | 25/03/2015 |
| 2) | M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur | 024482 | 26/03/2015 |
| 3) | M/s.Swastik Constructions, Kolhapur. | 024483 | 26/03/2015 |

तरी उपरोक्त विषयांकित कामांसाठी (Third Call) ई-निविदा प्रक्रियेव्दारे अपलोड झालेल्या ई-निविदांचे Technical Bid मा.प्रशासकिय अधिकारी, पाणी पुरवठा विभाग यांचे समक्ष दि. 31/03/2015 रोजी सकाळी 11:00 वाजता उघडणेत आले तसेच तद् नंतर ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत करण्यात आली. त्यानुसार उपरोक्त तीनपैकी तीनही ठेकेदार पात्र होत असल्याने सदर ठेकेदारांचे लिफाफा क्रं. 02 Commercial Bid त्याच दिवशी दुपारी 02:00 वाजता मा.प्रशासकिय अधिकारी, पाणी पुरवठा विभाग यांचे समक्ष उघडणेत आले. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

Estimated Cost:- Rs 3,76,57,209/-

| Sr.No. | Bidder's Name | Quoted Percentage | Quoted Rate | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur. | 45.00% Above | 5,46,02,953/- | L3 |
| 2 | M/s.Swastik Constructions, Kolhapur. | 43.30% Above | 5,39,62,780/- | L2 |
| 3 | R.K.Sawant, Civil Contractor, Nashik. | **6.56% Below** | **3,51,86,896/-** | **L1 (lowest)** |

**उपरोक्त तपशिलात नमुद केलेप्रमाणे ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत.**

1. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.16/04/2015 रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Sheet) करणेचे कामाबाबत केलेल्या कार्यवाहीस मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन सादर करण्यात आले.

2. तद् नंतर मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे दि.06/05/2015 रोजीचे आदेशान्वये ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांची निविदा मंजूर करणेस परवानगी देण्यात आली व ठेकेदार यांनी केलेले काम शासन मान्यताप्राप्त इंजिनियर्सकडून प्रमाणित करुन घेणेबाबत निर्देश देण्यात आले.

3. त्यानुसार दि.09/05/2015 रोजी ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांना दयावयाचा कार्यादेश स्वाक्षरीस सादर करण्यात आला. तथापि त्यावर तात्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी तोंडी चर्चा केली, पावसाळयाचे दिवस असल्याने कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Sheet) करणेचे कामास अडचण येईल, काम कसे करणार अशी शंका उपस्थित केली व कार्यादेशावर स्वाक्षरी केली नाही अथवा काही कारणही नमूद केले नाही.

4. ठेकेदार यांना दि. 30/06/2015 रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष चर्चेकरीता बोलविण्यात आले असता त्यावेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा होवू शकली नाही. तद् नंतर ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांचे दि.30/06/2015 रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले. त्यामध्ये त्यांनी कामाचा कार्यारंभ आदेश अदयाप मिळालेला नसल्याने, त्वरीत कार्यारंभ आदेश मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच दि.11/07/2015 रोजीचे पत्रान्वये सदर ई-निविदेची Bid Validity दि.01/07/2015 पासून पुढे 60 दिवस म्हणजेच दि.01/07/2015 ते दि.29/08/2015 पर्यंत
नमुद केलेली होती. सदर कामाची त्यांचेकडुन देण्यात आलेली Bid Validity ची मुदत देखील संपुष्टात आलेली असल्याने ठेकेदार सदरहू काम करणेस इच्छुक असल्यास ई-निविदेची Bid Validity ची मुदत परत वाढवुन घ्यावी लागणार असल्याने ठेकेदार यांचेशी दि.23/09/2015 रोजी दुरध्वनीवर चर्चा करुन सदर कामाचे ई-निविदेची वैधता (Bid Validity) वाढविणेकरीता त्यांना विनंती करण्यात आली होती. त्यानुसार ठेकेदार यांनी दि.25/09/2015 रोजीचे ई-मेलद्वारे सदर ई-निविदेची वैधता दि.31/12/2015 पर्यंत वाढवून दिलेली आहे.

5. तरी यावर निर्णय होणेस तसेच निम्नतम दरधारक ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.16/04/2015 रोजीचे सभेतील निर्णय व मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे दि.06/05/2015 रोजीचे आदेशास अनुसरुन निम्नतम दरधारक ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांना कार्यादेश देणेसाठी दि.05/10/2015 अन्वये टिपणी सादर करण्यात आलेली होती. यावर उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी नमुद केलेप्रमाणे तात्कालीन कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सदर प्रस्ताव हेतुपरस्परपणे प्रलंबित ठेवलेचे दिसून आलेने सबब निम्नतम दरधारक ठेकेदार यांना कार्यादेश देवून माहितीसाठी सदर विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार निम्नतम दरधारक ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांना जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/4352/ 2015, दि.04/11/2015 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

6. **तसेच** उर्वरीत दोन ठेकेदार M/s.Swastik Constructions, Kolhapur व M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur यांची बयाना रक्कम परत करणेबाबतची कार्यवाही होणेसाठी दि.11/07/2015 रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर तात्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी कृपया चर्चा असा शेरा दिलेला होता. याबाबत वारंवार चर्चा करणेस जावूनही त्यांचेशी सदर विषयाबाबत चर्चा होवू शकली नाही.

**7.** उर्वरीत दोन ठेकेदार M/s.Swastik Constructions, Kolhapur व M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur यांची बयाना रक्कम परत करणेबाबतची कार्यवाही होणेसाठी दि. 23/09/2015 रोजी फेर प्रस्ताव सादर करणेत आला. यावर उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी विषय प्रलंबित राहिलेबाबत मा.व्यवस्थापन समितीपुढे विषय सादर करणेबाबत व काम सुरु करणेचे दृष्टीने ठेकेदार यांना समक्ष बोलावून चर्चा करता येईल असे निर्देश दिलेले आहेत.

निम्नतम दरधारक ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांना काम सुरु करणेपुर्वी त्यांनी यापुर्वी केलेल्या कामाची पाहणी करणेबाबत व संस्थान पाणी वितरणात अडचण येवू नये अशा मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे. उर्वरीत दोन ठेकेदार M/s.Swastik Constructions, Kolhapur व M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur यांची प्रत्येकी रु.3,80,000/- बयाना रक्कम त्यांना परत करावी लागणार आहे. तरी सदरचा विषय माहितीसाठी व निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Sheet) करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदार मे.आर.के.सावंत, नाशिक यांना दिलेल्या कार्यादेशास व उर्वरित निविदाधारकांची बयाना रक्कम परत करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Sheet) करणेकामी व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय संमत होऊनही निम्नतम दराचे ठेकेदारास कार्यादेश देणेस व उर्वरित निविदाधारकांची अनामत रक्कम परत करणेस तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी जाणीवपुर्वक विलंब केलेबाबत त्यांचेकडून लेखी खुलासा मागविण्यात यावा व अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन, मंत्रालय, मुंबई यांनाही याबाबत माहितीसाठी कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

विषय नं.१९ **संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानकरीता शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदरच्या साठवण तलावात साधारणत: ३० ते ४५ दिवस पाणी साठवून राहत असल्याने साठवण तलावात मोठया प्रमाणावर शेवाळ तयार होवून पाण्याची प्रत खराब होते. याकरीता यावर उपाय-योजना म्हणून शेवाळ नष्ट होण्यासाठी साठवण तलावात मस्यबीज सोडून मासे संगोपन करण्यात येते. तलावातील मासे शेवाळ खावून नष्ट करतात व त्यामुळे साठवण तलावातील पाणी स्वच्छ राहण्यास मदत होते.

मागील दोन-तीन वर्षापासून पावसाचे प्रमाण कमी झाल्याने धरणामध्ये पाण्याची पातळी कमी असल्यामुळे पाटबंधारे विभागाकडुन पाण्याचे रोटेशन कालावधीत वाढ झालेली आहे. तसेच यापुढे उन्हाळा सिझन असल्यामुळे रोटेशन कालावधीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. पाण्याचे रोटेशन उशिरा झाल्यास उन्हाळयात साठवण तलावातील पाणी पातळी कमी झाल्यास मासे मृत होण्याचा तसेच दुर्गंधी पसरण्याचा व पाणी दुषीत होण्याचा धोका आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०४/२०१५ निर्णयास अनुसरुन संस्थानचे कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफींग करणेचे कामांबाबत केलेल्या कार्यवाहीस मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन सादर करण्यात आलेले होते.मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. ०६/०५/२०१५ रोजीचे आदेशास अनुसरुन निम्नतर दरधारक मे. आर.के. सावंत नाशिक यांना कनकुरी साठवण तलावांस कॅन्व्हास प्रुफींग करणेचे कामांचा कार्यादेश देणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफींग करणेचे काम सुरु झाल्यास त्यापुर्वी साठवण तलावातील मासे विक्री करणे आवश्यक आहे.

सन २०११ मध्ये ३,०११ किलो मासे प्रति किलो रु. ५२/- याप्रमाणे विक्री करण्यात येवून एकुण रु.१,५६,५७२/- मात्रचे रकमेचा भरणा लेखाशाखेत करण्यात आलेला आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६२ नुसार संस्थानचे साठवण तलावातील मासे विक्री करणेसाठी स्थानिक मासे पकडणा-या व्यक्तिंकडुन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून साठवण तलावातील एकुण १२५६.५० किलो मासे प्रति किलो रु.१३०/- याप्रमाणे विक्री करण्यात येवून एकुण रु.१,६३,३४५/-मात्र रकमेचा भरणा लेखाशाखेत करण्यात आलेला आहे.

यावेळी संस्थानचे कनकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेसाठी स्थानिक मासे पकडणा-या व्यक्तिंकडुन बंद पाकिटातुन कोटेशन घेवून ते समक्ष उघडुन त्यातील जास्तीत-जास्त दर देणा-या कोटेशन धारकास मासे पकडुन विक्री करणेस परवानगी देता येईल.

तरी स्थानिक मासे पकडणा-या व्यक्तिंकडुन बंद पाकिटामधून कोटेशन घेवून ते समक्ष उघडुन त्यातील जास्तीत-जास्त दर देणा-या कोटेशनधारकास मासे पकडुन विक्री करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

निर्णय क्र.६०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावामधील मासे विक्री करणेसाठी स्थानिक मासे पकडणा-या व्यक्तिंकडुन बंद पाकिटामधून कोटेशन मागवून उच्चतम दरधारकास मासे पकडून विक्रीकरणेबाबतचा आदेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

विषय नं.२० **वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी कनकुरी, पिंपळवाडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.राहाता पाणी आरक्षणासाठी भाग भांडवलाची रक्कम रु.१८४.०० कोटी शासनाकडुन माफ होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) संस्थानची सध्याची पाण्याची वाढती गरज व सद्यस्थितीतील पाण्याची टंचाई लक्षात घेता, संस्थानकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविणेबाबत संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.०४ अन्वये ठरलेले आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ.कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे. या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ – रु.१९.०४ = रु.१९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वत: मान्यता आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये रु.१८३.९३ कोटी हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आलेले आहे. सदर अंशदानाच्या रकमेचा समावेश योजनेच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेला नाही.

वरील नमुद केलेप्रमाणे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी कळविल्यानुसार प्रस्तुतची योजना ही शिर्डी संस्थानकडुन पूर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत राबवावयाची झाल्यास कनकुरी व पिंपळवाडी या दोन गावांसाठीची किंमत वगळता संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी मात्र इतका हिस्सा येतो. तसेच लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांनी कळविल्यानुसार प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी खर्च संस्थानने उचलणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतका निधी संस्थानकडुन उपलब्ध करणेबाबत **तसेच,**

**ब)** मा.ना.राधाकृष्ण ए.विखे पाटील तत्कालिन मा.मंत्री कृषी व पणन महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांनी, पाणी पुरवठा योजनेबाबत मा.श्री अनिल कवडे, सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना अग्रेषित केलेले दि.२५/०६/२०१४ रोजीचे पत्राची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झालेली होती. उपरोक्त पत्रात तत्कालिन मा.मंत्री महोदय यांनी कळविले होते की, शिर्डी करीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन योजना प्रस्तावित केलेली आहे. सदर योजना संस्थानमार्फत ठेव स्वरुपात रक्कम जमा करुन राबविण्यात यावी असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामे सुचविले आहे.

तथापि केवळ संस्थानकरीताच स्वतंत्र व थेट पाईपलाईन करणे योग्य होणार नाही. तसेच योजनेचा संपुर्ण खर्च सुध्दा संस्थानमार्फत करणे उचित वाटत नाही. याच योजनेत शिर्डी शहरासह नजिकच्या केलवड, खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, वाळकी, नांदुर्खी बु., नांदुर्खी खु., कनकुरी व पिंपळवाडी या कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांचा समावेश केल्यास केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे संस्थानवरील खर्चाचा बोजा कमी होईल.

उपरोक्त गावांकरीता यापुर्वीच स्वतंत्र साठवण तलाव, उंच जलकुंभ व वितरण व्यवस्था तयार करण्यात आलेल्या आहेत. फक्त मुख्य पाईपलाईन नव्याने करुन त्याव्दारे अस्तित्वातील साठवण तलावात पाणी सोडण्याची व्यवस्था करावी लागणार आहे.

या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने संस्थान व शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायस्वरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध होवू शकणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांबरोबरच साई भक्तांनाही याचा लाभ होणार असल्याने, सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा. योजनेसाठी स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत व आवश्यक लोकवर्गणी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी अशी विनंती करण्यात आलेली होती.

सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. यावर खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायसवरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साईभक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेवून स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.

यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे

औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले."

उपरोक्त विषयास अनुसरुन प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे विधी विभागार्माफत ॲड. आर.एन.धोर्डे यांचेमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. १२३४६ दाखल करण्यात आलेले होते.

प्रस्तुत सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये मे.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी तारीख नेमलेली होती. उपरोक्त सिव्हील अर्जामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.२२/१२/२०१४ रोजी आदेश दिलेला आहे.

सदर आदेशाची प्रत इंटरनेटवर दि. ०३/०२/२०१५ रोजी प्राप्त झाली. मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि.२२/१२/२०१४ रोजीचे आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित असून, मा.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यावर अदयापपर्यंत शासनाची मान्याता प्राप्त झालेली नाही.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांचेकडुन वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी कनकुरी, पिंपळवाडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.राहाता पाणी आरक्षणासाठी भाग भांडवलाची रक्कम रु.१८४.०० कोटी शिर्डी संस्थानकडुन गोदावरी

मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयास वर्ग करणेबाबतचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून, त्यामध्ये वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी कनकुरी व पिंपळवाडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.राहाता या योजनेसाठी १४.६५ दलघमी.पाणी आरक्षणाचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे व तद्कालीन मा.मंत्री (कृषी व पणन) यांचे अध्यक्षतेखाली दि.१६/०४/२०१३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार निळवंडे जलाशयातून १४.६५ दलघमी.पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी मिळणेबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केलेला आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे उपस्थितीत दि.१९/०३/२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत पाणी आरक्षणाबाबतचा निर्णय सक्षम स्तरावर घेण्यात यावा व त्याअनुषंगाने श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांचेकडुन १४.६५ दलघमी.पाणी आरक्षणापोटी येणारी रक्कम भाग भांडवल स्वरुपात जलसंपदा विभागाने प्राप्त करुन घ्यावी असे निर्देश प्राप्त आहे.

उपरोक्त निर्देशानुसार वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी साठी निळवंडे जलाशयातुन १४.६५ दलघमी. पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे वर्ग करणेबाबतची कार्यवाही होणेस विनंती सदरचे पत्रात करण्यात आलेली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित असलेने वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी साठी निळवंडे जलाशयातुन १४.६५ दलघमी. पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे वर्ग करता येणार नाही असे संबंधीतांना पत्र देवून कळविणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळणेसाठी दि.०२ नोव्हेंबर, २०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती. यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी पाणी वापर हा साईभक्तांसाठी होणार आहे. व्यावसायिक नाही. त्यामुळे पाणी आरक्षणाची रक्कम शासनाकडुन माफ होणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती समोर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी साठी निळवंडे जलाशयातुन १४.६५ दलघमी. पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी शासनाकडुन माफ होणेसाठी उपरोक्त प्रस्ताव मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई यांचे मान्यतेस सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी साठी निळवंडे जलाशयातुन १४.६५ दलघमी. पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी शासनाकडुन माफ होणेसाठी उपरोक्त प्रस्ताव मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई यांचे मान्यतेस सादर करणेस मा.अध्यक्ष महोदय वइतर समिती सदस्य यांचे चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यांची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी शहरातील साफसफाईकरिता येणारा मासिक खर्च (अनुदान) मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी "श्री साईबाबांचे पदस्पर्शाने पावन झालेले शिर्डी शहर जगप्रसिध्द आहे. त्यामुळे शिर्डीला दररोज अंदाजे १ लक्ष भाविक साई दर्शनासाठी भेट देत आहेत. तसेच महत्वाच्या वार्षिक सण व उत्सवांच्या कालावधीत भाविकांची संख्या सुमारे २ ते ३ लक्ष एवढी प्रचंड प्रमाणात वाढत असते.

शिर्डी नगरपंचायत ही ' क ' वर्ग नगरपंचायत असून शहराची लोकसंख्या सुमारे ३६,००० एवढी आहे. नगरपंचायतीचे स्वत:चे उत्पन्न रहीवाशी नागरीकांकडून वसूल घेणा-या घरपट्टी पाणीपट्टी व दुकानभाडे व विविध फी व्दारे जमा होत असून सदर उत्पन्न वार्षिक सरासरी २.५ कोटी एवढेच आहे.

साई दर्शनासाठी शहरात येणारे भाविक दर्शन झालेनंतर शिर्डी शहरामधील महत्वाचे रस्ते, सार्वजनिक मोकळया जागा, सार्वजनिक इमारती व मंदिरासभोवतीच्या परीसरामध्ये दिवसरात्र वावर करीत असतात. विविध व दैनिक क्रिया पार पाडीत असतात. त्याचप्रमाणे भाविकांनी आणलेली विविध प्रकारची हजारो वाहने जागा मिळेल त्याठिकाणी पार्कींग करीत असतात.

त्यामुळे शिर्डी नगर पंचायतीने आपल्या रहिवाशी नागरीकांसाठी उभारणी केलेल्या रस्ते सांडपाणी व्यवस्था, सार्वजनिक दिवाबत्ती, साफसफाई रहदारी बाजार, पार्कींग, पिण्याचे पाणी इ. सर्व पायाभूत सुविधावर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. व त्यामुळे रहिवाशी नागरीकांच्या नाराजीस तोंड द्यावे लागत आहे.

त्यामुळे शिर्डी नगर पंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन संदर्भात आणि सांडपाणी विल्हेवाटी संदर्भात पार पाडावयाची शिर्डी नगरपंचायत आणि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या दोन्ही संस्थांच्या दृष्टीने अत्यंत निकडीची आहेत.

या कार्यालयाने आपले कार्यालयाशी चर्चा करून साफसफाईकरिता वार्षीक निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार बी.व्ही.जी. इंडिया प्रा. लि. या कंपनीची प्रती महिना रु. १६,७७,११८/- इतक्या रकमेची निविदा दि. ०४/१०/२०११ रोजी प्राप्त झालेली आहे. सदर निविदेतील रक्कम शिर्डी नगर पंचायतीस खर्च करणे शक्य नाही. नगर पंचायतीचे उत्पन्नामधून आपल्या रहिवाशी नागरिकांना स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, रस्ते, बाजार, सांडपाणी निकासी, बगीचे इ. नगर परिषद कायदा १९६५ कलम ४९ मध्ये नमुद सुमारे ६२ प्रकारची कामे पार पाडावयाची आहेत. सदरची जबाबदारी पार पाडणेसाठी नगर पंचायत स्वत:चे तुटपुंजे उत्पन्न व शासनाच्या विविध योजनामधून अनुदान मिळवून प्रयत्न करीत आहे.

तरी शिर्डी शहरात साफसफाई करिता आज रोजी दरमहा रु. २५.०० लक्ष इतकी रक्कम (अनुदान) शिर्डी नगर पंचायतीस मिळावी." अशी विनंती केली.

सध्या शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांना त्यांचे मागणीप्रमाणे नगर-मनमाड रोड व मनोजकुमार पथ साफसफाईकामी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१२/०३/२०१५ सभेतील निर्णय क्र. ८६ चे आदेशास अनुसरुन १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ करिता प्रतिदिनी ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविण्यात येत आहेत. त्यांचे वेतनापोटी संस्थानला एक वर्षाचे कालावधीसाठी रु. ५२,१९,५००/- इतका खर्च येत आहे.

शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी संदर्भिय पत्राने दरमहा २५ लाख रुपयांची मागणी केलेली आहे. ( वार्षिक रु. तीन कोटी ) त्यास अनुसरुन सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०३/२०१३ रोजीचे सभेत विषय नं. ५६ ने ठेवण्यात आला त्यावर निर्णय क्र. ३१७ ने असे ठरले की, सदरहू विषयावर सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी नगर पंचायतीच्या मा.नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांना पुढील सभेपुढे समक्ष बोलविणेत यावे. त्याप्रमाणे जा.नं.एसएसएस/ वशी-आरोग्य/८४८/२०१३ दि. २०/०५/२०१३ ने शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांना निर्णयाबाबत कळविण्यात आले मात्र पुढील सभेची वेळ व तारीख कळविण्यात आलेली नाही.

दि. १६/११/२०१५ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी संस्थानकडे दाखल केलेल्या प्रस्तावांचे सद्य:स्थितीबाबत सभा आयोजित करण्यात आली होती त्यावेळी सदरचा विषय सद्य:स्थितीसह मा. त्रिसदस्य समितीपुढे ठेवावा असे ठरले.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.६०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानचे काम पहात असलेली समिती अस्थायी असल्यामूळे धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाही, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग.)

---

विषय नं.२२ **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीकरीता खाजगी व महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे मालकीचे जागेत वाहनतळे विकसित करणेकामी तात्पुरत्या स्वरुपात घेतलेल्या जमिनीचे भाडेपट्ट्याबाबत.**

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे दि.२८ ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या मुख्य पर्वणी कालावधीत शिर्डी येथे भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इ. सोयी-सुविधा संस्थानतर्फे पुरविण्यात आल्या होत्या.

याकरीता तात्पुरती वाहनतळे, निवारा शेड व्यवस्थेसाठी शिर्डी व परिसरात विविध शासकिय विभागामार्फत जागांची पाहणी करुन, पाहणीअंती वेगवेगळया ०७ ठिकाणी वाहनतळांसाठी जागा निश्चित करणेत आल्या. याबाबत संस्थानने जा.नं.एसएसएसटी/कुंभमेळा-शताब्दी/६०४१/२०१५,दि.९/३/२०१५ अन्वये ७ वाहनतळांसाठी विविध जमीनी विनामूल्य वापरासाठी मिळणेबाबत मा.तहसीलदार, राहाता यांचेकडे प्रस्ताव सादर केला होता.

कुंभमेळा कालावधीत शिर्डी येथे श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी होणा-या गर्दीचे अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधा व नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर क्र. जि./स्वी.स./ कुंभमेळा४१/

२०१५, अहमदनगर, दि.२९/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली तालुका स्तरीय कुंभमेळा समितीची स्थापना करणेत आली. या तालुकास्तरीय समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये व दि.३१/०१/२०१५ रोजीचे बैठकीत अतिरिक्त वाहनतळे, निवारा शेड उभारणी करणेकामी जागांची पाहणी करण्याचे ठरले. त्यानुसार दि.०१/०२/२०१५ रोजी शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी शहर वाहतूक शाखा व महसूल विभाग यांचेसह शिर्डी व परिसरात वेगवेगळया जागांची पाहणी करणेत आली. पाहणीअंती ठरल्यानुसार मा. तहसिलदार, राहाता यांना संस्थान जा.नं.एसएसएसटी/बांधकाम-कुंभमेळा/६८१/२०१५,दि.५/५/२०१५ रोजीचे पत्रान्वये पुर्वीच्या ७ वाहनतळांव्यतिरिक्त आणखी ४ वाहनतळे तात्पुरते विकसित करण्यासाठी व त्याकामी करावयाचे पूर्व तयारीसाठी दिनांक १ जुलै, २०१५ ते दि.३० सप्टेंबर, २०१५ अखेर तीन महिन्यांचे निश्चित कालावधीसाठी अधिगृहीत करुन किंवा विनामूल्य भाडेपट्टयाने उपलब्ध करुन देणेकामी सुधारित प्रस्ताव पाठवून विनंती करण्यात आली होती.

मा.तहसिलदार, राहाता यांनी खालील तक्त्यात नमूद आदेशान्वये सदरच्या जमीनी वाहनतळ व्यवस्थेकरीता वापरासाठी ताबा घेतल्याच्या दिनांकापासून ते ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात अधिग्रहित करुन दिल्या आहेत. तसेच संबंधित जमिन मालक यांना करारनामा करणे बंधनकारक राहील असे मा. तहसिलदार यांचे सदरहू आदेशांमध्ये नमूद आहे. प्रत्येक आदेशात नमूद रकमेप्रमाणे भाडेपट्टा व नुकसान भरपाई आदेशीत करुन प्रत्येक जमीन मालकास एकूण रकमेपैकी ६० टक्के रक्कम सत्वर आदा करणेबाबत व उर्वरित ४० टक्के रक्कम सप्टेंबर २०१५ मध्ये आदा करणेचे निर्देशित केले आहे. त्यास अनुसरुन संस्थानने सदर जमिनीचे खालील नमूद तारखेस ताबा पावत्या करुन जमिनी वाहनतळ वापर म्हणून उपयोगात आणणेसाठी ताब्यात घेतल्या.

| वाहनतळ क्र. | सर्व्हे/ गट नं. | जागा मालक | क्षेत्र (हे-आर) | क्षेत्र (एकर) | तहसिलदार राहाता आदेश क्र., दिनांक | ताबा पावती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ५/४/अ | गारगोटी इंडियन मिनरल्स लि. सिन्नर (श्री.कृष्णचंद शामसुंदर पांडे/ रमेशचंद शामसुंदर पांडे) सावळीविहिर | 1.2780 | 3.157 | कावि/जमिन/५०२/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | जमिन धारक सदरचे क्षेत्र विनामोबदला भाडेतत्वाने देण्यास तयार आहे. |
| 2 | २३१/२ | सोमय्या प्रॉपर्टीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. सावळीविहिर बु. | 6.8800 | 16.995 | कावि/जमिन/५१९/ २०१५, दि.२९/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | जमिन धारक सदरचे क्षेत्र विनामोबदला भाडेतत्वाने देण्यास तयार आहे. |
| 3 | २३/१ | श्री विनोदकुमार किसनदास प्रेमाणी, निमगाव - को-हाळे | 0.0700 | 0.173 | कावि/जमिन/५०१/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| | २२/१ | श्रीमती वंदना सतिष तुरकणे व सतिष भा. कातोरे, निमगाव-को-हाळे | 0.2100 | 0.519 | कावि/जमिन/५०६/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| | २३/१ | श्रीमती कमल रमेश घायवट व इतर, निमगाव - को-हाळे | 0.0750 | 0.185 | कावि/जमिन/५१८/ २०१५, दि.२९/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| | २३/१ | श्री हरी तुळशीराम जगताप, निमगाव - को-हाळे | 0.0750 | 0.185 | कावि/जमिन/५१७/ २०१५, दि.२९/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| | २२/२ | श्री सुनिल शामराव पाटील, निमगाव - को-हाळे | 0.2100 | 0.519 | कावि/जमिन/५३९/ २०१५, दि.१४/०७/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| | ०२३/२ | श्री. जयकिशन भिवसेन धिंग्रा, निमगाव - को-हाळे | 0.4550 | 1.124 | कावि/जमिन/६०१/ २०१५, दि. २३/०७/२०१५ | २२-०७-२०१५ | वापरमुल्य अदा करावयाचे नाही. |
| | २२/१ | श्री. अरुण धनसिंग पाटील,व इतर निमगाव - को-हाळे | 0.4100 | 1.013 | कावि/जमिन/६१९/ २०१५, दि. १८/०६/२०१५ | सदर क्षेत्राचा ताबा घेतलेला नाही. | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | ८५,८६, ८७,८९, ९०/२ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.,निमगाव - को-हाळे | 10.8700 | 26.851 | कावि/जमिन/५००/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| 5 | १५९ व १६१ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या., शिर्डी | 3.6700 | 9.066 | कावि/जमिन/५००/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| 6 | २८०/३ | श्री साईप्रसाद प्रॉपर्टीज लि., साकुरी | 2.2000 | 5.434 | कावि/जमिन/५०३/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | ०३-०७-२०१५ | वापरमुल्य अदा करावयाचे आहे. |
| 7 | ३५६/२, ३५६/३ | श्रीमती कल्याणी रविश्री कंदुला, साकुरी | 3.1790 | 7.853 | कावि/जमिन/५३८/ २०१५, दि.१०/०७/२०१५ | २२-०७-२०१५ | |
| 8 | ५९/१ | श्रीमती सुशिलाबाई दिलीप गोंदकर, शिर्डी | 0.6800 | 1.680 | कावि/जमिन/५०४/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | जमिन धारक सदरचे क्षेत्र विनामोबदला भाडेतत्वाने देण्यास तयार आहे. |
| 9 | ३४८ | श्री संतोष शोभाचंद लोढा, श्री कांकरीया व इतर, | 0.2400 | 0.593 | कावि/जमिन/६१६/ २०१५, दि.३०/०७/२०१५ | ०६-०८-२०१५ | वापरमुल्य अदा करावयाचे आहे. |
| 10 | १७५ | श्री. शिवाजी भिमराज चौधरी, नांदुर्खी | 1.4500 | 3.582 | कावि/जमिन/५०५/ २०१५, दि.१८/०६/२०१५ | २२-०७-२०१५ | |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे संस्थानने वाहनतळ व्यवस्था करणेसाठी शिर्डी व परिसरातील खाजगी मालकीच्या व शेती महामंडळाच्या मालकीच्या एकूण ११ ठिकाणाच्या जमिनी मा. तहसिलदार, राहाता यांचेकडून अधिग्रहित करुन सदर जमिनींचा ताबा घेतलेला आहे. यामध्ये वाहनतळ क्रं. ०३ वगळता इतर वाहनतळांचे ठिकाणी जागेच्या सपाटीकरणासह मुरुमीकरण केले. यामधील महत्वाचे वाहनतळ क्र. ०१,०२,०४,०५,०६ व ०७ या ठिकाणी तात्पुरती निवारा शेड, क्लोक रुम, स्वच्छतागृहे, अल्पोपहार स्टॉल, सुरक्षा चौक्या आदि सुविधा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्या होत्या. तसेच मौजे निमगाव को-हाळे गट नं. १७२ मधिल संस्थान मालकीचे क्षेत्रामध्ये मुरुमीकरण व सपाटीकरण करणेत आले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/१/२०१५रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६ अन्वये शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी विविध कामे विहित कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली असून, मा.उच्च न्यायालयाने दि.६/५/२०१५ चे निर्देशान्वये, सिंहस्थ कुंभमेळा खर्चासाठी स्वतंत्र खाते ठेवून, खर्चाची सविस्तर माहिती कुंभमेळा संपल्यानंतर ४ आठवडयांचे आंत मा.उच्च न्यायालयाला सादर करावयाचे अटीवर या खर्चास मान्यता दिलेली आहे. तथापि जमीनीचे भाडेपट्टयासाठी आदा करावयाचे रकमेचा या खर्चाचे रकमेत समावेश नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१७२ अन्वये ०४ वाढीव वाहनतळे विकसित करणे व वाहनतळांच्या जागांकरीता भाडेपट्टा आदा करणेसाठी अंदाजे रक्कम रु.२,३९,२५,७२६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. या एकूण रकमेत पूर्वीचे ७ अधिक नवीन ४ अशी ११ वाहनतळे विकसित करण्यासाठी आवश्यक असणारे एकूण ८७.४९ एकर जमीनीचा ९० दिवसांचे कालावधीसाठी भाडेपट्टा आदा करणेकामी एकूण रक्कम रु. ९८,५८,६५१/- मात्र मंजूर करण्यात आलेली आहे.

तथापी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे वाहनतळ क्रं. ०१, ०२, व ०८ या क्षेत्राचे जमिन मालकांनी सदरचे क्षेत्र विनामुल्य वापरासाठी दिलेले आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिलेल्या निर्देशानुसार गर्दीचे अंदाजानुसार वाहनतळ क्रं. ०३ विकसीत केलेले नाही.

याव्यतीरिक्त वाहनतळ क्र.०४,०५,०६,०७,०९ व १० करीता मा. तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अदा करावयाचे वापरमुल्य खालिलप्रमाणे आहे. -

**अ) ताबापावती केलेल्या तारखेपासून दि.३०/०९/२०१५ अखेर होणारी वापरमुल्य रक्कम खालीलप्रमाणे:-**

| वाहनतळ क्र. | सर्व्हे/ गट नं. | जागा मालक | क्षेत्र (हे-आर) | क्षेत्र (एकर) | ताबा पावती दिनांक | एकूण दिवस | भाडे वापर मुल्य दर | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | ८५, ८६, ८७, ८९, ९०/२ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.,निमगाव - को-हाळे | 10.8700 | 26.851 | २२/०७/२०१५ परंतु प्रत्यक्ष ताबा दि. ०४/०७/२०१५ पासून | ८९ | १०००/- | ३१,९६,६१३.०० -४८,६८३.०० =३१,४७,९३०/- | शेती महामंडळाने वाहनतळ वापराचे ३५ एकर ३७ गुंठे जमिनीचे वापरमुल्य रु. ३१,४७,९३०/- मात्रची मागणी केलेली असल्याने त्यानुसार रु. ४८,६८३/- मात्र कपात केले आहेत. |
| 5 | १५९ व १६१ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या., शिर्डी | 3.6700 | 9.066 | | ८९ | १०००/- | | |
| 6 | २८०/ ३ | श्री साईप्रसाद प्रॉपर्टीज लि., साकुरी | 2.2000 | 5.434 | ०३/०७/२०१५ | ९० | ५००/- | २,४४,५३०.०० -५१,०००.०० = १,९३,५३०/- | श्री साईप्रसाद प्रॉपर्टीजचे मॅनेजर यांनी होणा-या एकूण रकमेतून रु. ५१,०००/- मात्र इतकी रक्कम कमी करणेची इच्छा व्यक्त केली आहे. |
| 7 | ३५६/ २, ३५६/ ३ | श्रीमती कल्याणी रविश्री कुंदला, साकुरी | 3.1790 | 7.853 | २२/०७/२०१५ | ७१ | २२८९/- | १२,७६,२६२.०० -२,११,०००.०० = १०,६५,२६२/- | जागा मालक यांनी होणा-या एकूण रकमेतून रु. २,११,०००/- मात्र इतकी रक्कम कमी करणेची इच्छा व्यक्त केली आहे. |
| 9 | ३४८ | श्री संतोष शोभाचंद लोढा, श्री कांकरीया व इतर, रुई | 0.2400 | 0.593 | ०६/०८/२०१५ | ५६ | ३४३/- | ११,३९०/- | जागा मालक यांनी पूर्ण रकमेची मागणी केलेली आहे. |
| 10 | १७५ | श्री. शिवाजी भिमराज चौधरी, नांदुर्खी | 1.4500 | 3.582 | २२/०७/२०१५ | ७१ | ३२३/- | ८२,१४६/- | जमिनधारक यांनी सदर क्षेत्राचे एकूण भाडे रु. ५,००,०००/- ची मागणी केली आहे. |
| | | | | | | | **एकूण रक्कम रुपये:-** | ४५,००,२५८/- | |

उपरोक्त तक्त्यात नमूद रकमेप्रमाणे प्रत्यक्ष ताबा घेतलेल्या तारखेपासूनचे कालावधीनुसार सदर जमिनीचे वापरमुल्य रक्कम रु. ४५,००,२५८/-(अक्षरी रुपये:- पंचेचाळीस लाख दोनशे अठ्ठावन्न) मात्र इतकी होते.

**<u>वाहनतळ क्रमांक ०४ व ०५ बाबत</u>:-** संस्थानने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनीचे भाडेपट्ट्याबाबत मा. जिल्हाधिकारी सो.,अहमदनगर यांना सदरहु जमिनींचा वापर हा सिंहस्थ कुंभमेळयाकरीता म्हणजेच सार्वजनिक प्रयोजनासाठी होणार असल्याने, त्यासाठी स्थावर व्यवस्थापक, म. रा. शे. म. लक्ष्मीवाडी यांचे ८९ दिवसांचे मागणीऐवजी फक्त प्रत्यक्ष वापराचे ३० दिवसाचे कालावधीसाठी भाडेपट्टयाची आकारणी सवलतीचे दराने होणेकामी मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती

महामंडळ पुणे यांना उचित पत्रव्यवहार करणेबाबत इकडील कार्यालयाचे जा. क्र. एसएसएसटी/बांधकाम /कुंभमेळा - शताब्दी कक्ष /३१८४/२०१५,दि.०३/०९/२०१५ चे पत्राव्दारे विनंती केलेली होती. त्यास अनुसरुन मा. जिल्हाधिकारी सो. अहमदनगर यांनी दि. १४/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांना दिलेल्या पत्रात संस्थानला नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ निमित्त तात्पुरते कालावधीसाठी वाहनतळ, निवाराशेड, इत्यादी व्यवस्था विकसीत

करावयाची असल्याने, या जमिनी दोन महिने अगोदर ताब्यात घेणे जरुरीचे होते. तथापी या जमिनींचा भाविकांसाठी वाहनतळ, निवाराशेड इत्यादी करीता प्रत्यक्ष वापर हा दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या ३० दिवसांचे कालावधीत झालेला आहे. सदरहु जमिनींचा वापर हा सिंहस्थ कुंभमेळ्याकरीता सार्वजनिक प्रयोजनासाठी झालेला असल्याने ८९ दिवसांचे मागणीऐवजी फक्त प्रत्यक्ष वापराचे ३० दिवसांचे कालावधीसाठी भाडेपट्टयाची आकारणी सवलतीचे दराने होणेबाबत विनंती केली होती.

तथापी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांनी दि.२८/०९/२०१५ रोजीचे पत्राव्दारे असे कळविले आहे की, तहसिलदार राहाता यांचे दि. १८/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये सन-२०१५

चे सिंहस्थ कुंभमेळयासाठी जमीन क्षेत्र ३५ एकर ३७ गुंठे अधिग्रहण करण्यात आले. त्या आदेशापासून शेती महामंडळाने सदर क्षेत्र आदेशातील प्रयोजनासाठी राखून ठेवले. त्यावर शेती महामंडळाला संयुक्त शेती पध्दतीने शेती करण्याची प्रक्रीया राबविता आली नाही, किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता आला नाही. यास्तव प्रत्यक्ष वापराचे ३० दिवसांचे कालावधीसाठी भाडेपट्टयाची आकारणी सवलतीच्या दराने होण्याबाबत विनंती मान्य करता येणार नाही. तरी एकूण ८९ दिवसांचे वापरमुल्य रक्कम रु. ३१,४७,९३०/- मात्र शेती महामंडळाकडे त्वरीत भरणेबाबत श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना कळविणेबाबत मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांना त्यांनी विनंती केलेली आहे.

मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सामान्य प्रशासन,अहमदनगर यांनी क्र. साशा/संकीर्ण/कार्या/२८५८/२०१५, दि.२८/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांचे वर नमूद दि.२८/०९/२०१५ रोजीचे पत्र उचित कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयाकडे पाठविलेले आहे.

**वाहनतळ क्रमांक ०६ बाबत:-** उपरोक्त तक्त्यात नमूद साकुरी येथे विकसीत केलेले वाहनतळ क्रमांक ०६ साठी श्री साईप्रसाद प्रॉपर्टीज लि. चे मॅनेजर विकास गणपत सावंत यांचे अधिग्रहीत केलेल्या जमिनीचे वापरमुल्य रक्कम रु.२,४४,५३०/- मात्र इतके होते. याबाबत मॅनेजर विकास गणपत सावंत यांनी त्यांचे दि.२७/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये रु. ५१,०००/- मात्र इतकी रक्कम कमी करुन जे राहील ते भाडे मिळावे, असे संस्थानला कळविले आहे.

**वाहनतळ क्रमांक ०७ बाबत:-** उपरोक्त तक्त्यात नमूद साकुरी येथे विकसीत केलेले वाहनतळ क्रमांक ०७ साठी सौ. कल्याणी रविश्री कुंदला यांचे अधिग्रहीत केलेल्या जमिनीचे वापरमुल्य रक्कम रु.१२,७२,५२४/- मात्र इतके होते. याबाबत सौ.कल्याणी रविश्री कुंदला यांनी त्यांचे दि. २८/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये मी स्वखुशीने २,११,०००/- मात्र इतकी रक्कम कमी करुन जे राहील ते भाडे मिळावे अशी इच्छा आहे, असे संस्थानला कळविले आहे.

**वाहनतळ क्रमांक १० बाबत:-** नांदुर्खी येथे विकसीत केलेले वाहनतळ क्रमांक १० हे श्री. शिवाजी भिमराज चौधरी यांचे मालकी हक्काचे मौजे नांदुर्खी येथील गट नं. १७५ मधील क्षेत्र २.७१ हे. आर पैकी क्षेत्र १.४५ हे. आर क्षेत्राची संस्थानने ताबा पावती केलेली असून त्यापैकी ०१ एकर क्षेत्र संस्थानकडून प्रत्यक्षात विकसीत करणेत आलेले होते. परंतु सदर जमिनीबाबत श्रीमती बेबीनंदा शरदराव गोंदकर व इतर ०७ यांनी दि.२५/०७/२०१५ रोजीचे उता-यासह संस्थानकडे दिलेल्या अर्जात श्री शिवाजी भिमराज चौधरी यांचेविरुध्द मे. राहता येथील मे. सिव्हील जज्ज साहेब यांचे कोर्टामध्ये दावा प्रलंबीत आहे. सदरचा दावा न्यायप्रविष्ठ असताना शिवाजी भिमराज चौधरी यांना सदर जमिनीचा पूर्ण भाडेपट्टा न देता उता-यावर नावे असलेल्या सर्व व्यक्तीना सदर रकमेचे समान हिश्यात वाटप करावे असे नमूद केले आहे. सदर जमिनीचा भाडेपट्टा व नुकसान भरपाई रक्कम श्री शिवाजी भिमराज चौधरी यांना अदा करावी किंवा कसे याबाबत पुढील आदेशासाठी मा. तहसिलदार, राहाता यांना दि.०५/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. परंतु त्यांचेकडून याबाबत अद्याप आदेश झालेला नाही.

**ब) सिंहस्थ कुंभमेळा मुख्य पर्वणी कालावधीनुसार प्रत्यक्ष वापर हा दि. २८/०८/२०१५ ते दि. २६/०९/२०१५ अखेर झालेला असल्याने फक्त ३० दिवसांचे वापरमुल्य रक्कम खालीलप्रमाणे:-**

| वाहन तळ क्र. | सर्व्हे/गट नं. | जागा मालक | क्षेत्र (हे-आर) | क्षेत्र (एकर) | ताबा पावती दिनांक | एकूण दिवस | भाडे वापर मुल्य दर रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | ८५,८६, ८७,८९, ९०/२ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या., निमगाव - को-हाळे | 10.8700 | 26.851 | २२-०७-२०१५ परंतु प्रत्यक्ष ताबा दि. ०४/०७/२०१५ पासून | ३० | १०००/- | ८,०५,५३०.०० -२,७१,९८०.०० = १०,७७,५१०/- |
| 5 | १५९ व १६१ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या., शिर्डी | 3.6700 | 9.066 | | ३० | १०००/- | |
| 6 | २८०/३ | श्री साईप्रसाद प्रॉपर्टीज लि., साकुरी | 2.2000 | 5.434 | ०३-०७-२०१५ | ३० | ५००/- | ८१,५१०/- |
| 7 | ३५६/ २,३ | श्रीमती कल्याणी रविश्री कुंदला, सांकुरी | 3.1790 | 7.853 | २२-०७-२०१५ | ३० | २२८९/- | ५,३९,२६६/- |
| 9 | ३४८ | श्री संतोष शोभाचंद लोढा, श्री कांकरीया व इतर, रुई | 0.2400 | 0.593 | ०६-०८-२०१५ | ३० | ३४३/- | ६,१०२/- |
| 10 | १७५ | श्री. शिवाजी भिमराज चौधरी, नांदुर्खी | 1.4500 | 3.582 | २२-०७-२०१५ | ३० | ३२३/- | ३४,७१०/- |
| | | | | | | | **एकूण रक्कम रुपये:-** | **१७,३९,०९८/-** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे प्रत्यक्ष वापराचे ३० दिवसांचे कालावधीसाठी वापरमुल्य रक्कम रु. १७,३९,०९८/- मात्र इतकी होते. तथापी वाहनतळ क्रमांक ०४ व ०५ विकसीत करणेचे वेळी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ लक्ष्मीवाडी यांना दि. ०४/०७/२०१५ रोजी रु. ४०,०००/- मात्र इतकी रक्कम अनामत म्हणून भरलेली आहे. तसेच दि.१०/०९/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये रु. ८,०८,२००/- मात्र इतकी रक्कम अॅडव्हान्स म्हणून अदा

केली आहे. करीता सदरची रक्कम अंतीम वापरमुल्य अदा करतेवेळी कपात करुन उर्वरीत रक्कम प्रत्यक्ष अदा करणेत येईल.

मा. तहसिलदार, राहाता यांनी आदेशीत केलेप्रमाणे प्रत्यक्ष जमिनीचा ताबा घेतलेल्या तारखेपासून चे कालावधीसाठी उपरोक्त "अ" तक्त्यात दर्शविलेप्रमाणे एकूण वापरमुल्य रक्कम रु. ४५,००,२५८/- मात्र इतकी होते.

तरी उपरोक्त "अ" तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मा. तहसिलदार यांचे आदेशानुसार प्रत्यक्ष ताबा घेतलेल्या तारखेपासून होणारी रक्कम रु.४५,००,२५८/- मात्र अदा करावी किंवा "ब" तक्त्यात दर्शविलेप्रमाणे दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ अखेर ३० दिवस या प्रत्यक्ष वापर कालावधीची रक्कम रु.१७,३९,०९८/- मात्र अदा करावी, याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयी सुविधेकरीता वाहनतळे विकसित करणेकामी तात्पूरत्या स्वरुपात अधिग्रहीत करणेत आलेल्या जमिनींचे मा.तहसिलदार, राहाता यांनी आदेशीत केलेप्रमाणे प्रत्यक्ष ताबा घेतलेल्या तारखेपासून चे कालावधीसाठी उपरोक्त "अ" तक्त्यात दर्शविलेप्रमाणे एकूण वापरमुल्य रक्कम रु.४५,००,२५८/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन - २०१५ चे कालावधीसाठी वाहनतळे विकसीत करणेकामी वापरणेत आलेल्या गौणखनिज स्वामित्वधनाची सुधारीत दरानुसार होणारी फरकाची रक्कम अदा करणेबाबत..**

**प्रस्ताव-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत शिर्डी व परिसरात साईभक्तांचे सुविधेकरीता वाहनतळे विकसीत करण्याचे काम ठेकेदार मे. एस. के. येवले अँण्ड कं., संगमनेर यांना देण्यात आलेले आहे. सदर काम ठेकेदार यांनी दि.२५/०८/२०१५ रोजी पूर्ण केले आहे. सदर कामाचे मंजूर निविदा रकमेत (Contract Value) रु.६४,८२,४३५/- मात्र इतक्या गौणखनिज स्वामित्वधन रकमेचा समावेश आहे. या प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| Name of Work: | Earthwork, WBM and Allied Works for Temporary Parkings at 7 Locations in and around Shirdi for Kumbha Mela-**2015** for Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. |
| Contractor: | M/s. S. K. Yewale and Co., Sangamner. |
| Resolution No. & Date: | No.169, dt.24/06/20**15.** |
| Work order No. & Date: | No.SSST/CONST/18**98/2015**, dt.04/07/**2015**. |
| Type of Tender: | Percentage Rate E-Tender. |
| Estimated amount excluding Royalty Charges: | Rs.**5,68,70,642**/-. |
| Tender Percentage: | 31.77 % Below. |
| Contract amount excluding Royalty Charges: | Rs.**3,88,02,839**/-. |
| Estimated Value of Royalty Charges: | Rs.64,82,435/-. |
| Total Contract Value: | Rs.4,52,85,274/-. |
| Date of Commencement: | Dt.04/07/2015. |
| Time for Completion: | Two calendar months (60 Days). |
| Scheduled date of Completion: | Dt.25/08/2015. |
| Extension for Time Limit: | Nil. |
| Actual Date of Completion: | Dt.25/08/2015. |

ठेकेदार यांचेशी करणेत आलेल्या करारनाम्यात कलम ५ अन्वये खालिल शर्तीचा समावेश आहे.

"It is the responsibility of the contractor to pay the royalty charges to concerned Tahasil Office of Govt. of Maharashtra and furnish the challans thereof to the Sansthan. The royalty charges will be paid for the quantities of materials consumed and billed for the work at the estimated rate of Rs.70.64 per cum i.e. without any deduction of tender percentage."

गौणखनिज स्वामित्वधन **(Royalty Charges)** चे अदायगीबाबत ठेकेदार यांनी दि.०९/०७/२०१५ रोजीचे पत्राव्दारे या कामासाठी होणारी रॉयल्टी रक्कम त्यांचे होणारे देयकांमधून कपात करुन संबंधीत तहसिलदार यांना भरणा करावी अशी विनंती केली आहे.

वर नमूद करारनामा शर्तीनुसार ठेकेदार यांनी संबंधित तहसिल कार्यालय येथे स्वामित्वधन रकमेचा भरणा करुन चलनांच्या प्रती संस्थानकडे जमा करावयाच्या आहेत. बिलानुसार देय होणारी स्वामित्वधन रक्कम संस्थानकडून

त्यासाठी सार्वजनीक बांधकाम विभाग व शिर्डी नगरपंचायत यांचे धर्तीवर संस्थानतर्फे सदर कामासाठी देय होणारी स्वामित्वधन रक्कम थेट तहसिलदार, राहाता यांचेकडे जमा करणेस हरकत नाही असे मत आहे.

तहसिलदार, राहाता यांनी दि.१६/०७/२०१५ व दि.१३/०८/२०१५ चे पत्राव्दारे संस्थानमार्फत सुरु असलेल्या ज्या कामांमध्ये गौणखनिजांचा वापर करण्यात आलेला आहे, त्या कामांचे देयक अदा करणेपुर्वी तहसिल कार्यालयाचा ना-हरकत दाखला घेण्यात यावा, जेणेकरुन संबंधित ठेकेदाराने वापरलेल्या गौणखनिजाबाबत स्वामित्वधनाची रक्कम भरली असलेबाबत खात्री करता येईल असे कळविले आहे. तहसिलदार, राहाता यांचे सदर पत्रासोबत महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.११/०५/२०१५ ची प्रत जोडली आहे. त्यानुसार दगड, मुरुम व वाळू या बाबींसाठी गौणखनिज स्वामित्वधनाचा दर रु.४००/- प्रति ब्रास असा सुधारित करणेत आलेला आहे. तथापी वरील कामाचे निविदेत रु.२००/- प्रती ब्रास (रु.७०.६४ प्रती घनमीटर) या तात्कालीन प्रचलीत दराने स्वामित्वधनाचे रकमेचा समावेश करणेत आलेला आहे.

ठेकेदार मे. एस. के. येवले अॅण्ड कं., संगमनेर यांनी सदर कामाचे पहीले व अंतिम बिल सादर केलेले आहे. सदरहु अंतिम बिलातील गौणखनिजाचे परिमाण ६४८०२.४३ घनमीटर (२२८९८.३८ ब्रास) करीता महाराष्ट्र शासनाचे दि.११/०५/२०१५ चे अधिसूचनेतील सुधारीत दर रु.४००/- प्रति ब्रास प्रमाणे स्वामित्वधनाची देय रक्कम रु.९१,५९,३५२/- मात्र इतकी येते. तथापि, संस्थानमार्फत सदर कामाचे निविदेत समावेश केलेनुसार रु.२००/- प्रती ब्रास (रु.७०.६४ प्रती घनमीटर) या दराने एकुण रु.३९,१५,९८५/- मात्र रकमेचे धनाकर्ष इकडील जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/४३२८/२०१५, दि.०२/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये तहसिलदार, राहाता यांचेकडे जमा करणेत आलेले आहेत. तसेच ठेकेदार यांनी राहाता व कोपरगांव तहसिल कार्यालयाकडे दि.०६/०७/२०१५, दि.१४/०७/२०१५ व दि.२५/०७/२०१५ रोजीचे चलनादृवारे एकुण रु.६,६१,६५८/- मात्र इतकी रक्कम भरली असल्याचे दि.२१/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयास कळविले आहे. म्हणजे एकुण रु.४५,७७,६४३/- मात्र इतकी रक्कम शासनास भरणा केलेली आहे.

आता महाराष्ट्र शासनाचे दि.११/०५/२०१५ चे अधिसूचनेतील नविन सुधारीत दरानुसार रु.४५,८१,७०९/- मात्र इतकी रक्कम शासनाकडे भरणे बाकी आहे.

तहसिलदार, राहाता यांनी त्यांचे पत्र क्र.कावि/जमाबंदी/११८१/२०१५, राहाता, दि.२१/११/२०१५ राजीचे पत्रान्वये, विषयांकीत कामासाठी खालीलप्रमाणे गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा करणेकामी कळविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | मुरुम ६४८०२.४३ घनमीटर (२२८९८.३८ ब्रास) रॉयल्टी दर रु.४००/- प्रती ब्रास | ९१,५९,३५२/- |
| २ | आयकर- २% | १,८३,१८७/- |
| ३ | विक्रीकर- १०% | ९,१५,९३५/- |
| ४ | भूपृष्ठ भाडे- ५% | ४,५७,९६७/- |
| ५ | जिल्हा परिषद सेस- ५% | ४,५७,९६७/- |
| | एकुण रुपये- | १,११,७४,४०८/- |
| | (-) शासनाकडे भरणा केलेली रॉयल्टी रक्कम- | ४५,७७,६४३/- |
| | शिल्लक जमा करावयाची रॉयल्टी रक्कम रुपये- | ६५,९६,७६५/- |

उपरोक्तप्रमाणे रक्कम रु.६५,९६,७६५/- मात्र इतकी उर्वरीत रॉयल्टीची रक्कम शासनजमा करणेबाबतर त्यांनी कळविले आहे.

तथापि, वर नमूद महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.११/०५/२०१५ मध्ये आयकर, विक्रीकर, भूपृष्ठ भाडे, जिल्हापरिषद सेस आकारणेबाबत कुठलाही उल्लेख दिसून येत नाही. त्यामुळे या बाबी वगळून सुधारीत दरानुसार खालीलप्रमाणे रॉयल्टी रक्कम देय होते.

| अ.नं. | तपशिल | परिमाण/ एकक (घनमीटरमध्ये) | परिमाण/ एकक (ब्रासमध्ये) | सुधारित दर (ब्रासमध्ये) | रक्कम (.रू) |
|---|---|---|---|---|---|
| अ) | शासनाचे अधिसूचनेतील सुधारीत दरानुसार होणारी गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम: | | | | |
| १) | तहसिलदार, राहाता यांना सुधारीत दरानुसार देय होणारी गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम. | | | ४००/- | ९१,५९,३५२/- |
| | सुधारीत दरानुसार एकूण देय रॉयल्टी रक्कम (अ): | | | | ९१,५९,३५२/- |
| ब) | यापूर्वी अदा केलेली गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम: | | | | |
| १) | ठेकेदार यांनी राहाता व कोपरगांव तहसिल कार्यालयाकडे दि.०६/०७/२०१५, दि.१४.०७.२०१५ व दि.२५.०७.२०१५ रोजीचे चलनाद्वारे भरणा केलेली स्वामित्वधनाची रक्कम. | ---- | ---- | ---- | ६,६१,६५८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २) | संस्थानमार्फत जा.क्र.एसएसएसटी/ बांध/ ४३२८/ २०१५, दि.०२.११.२०१५ रोजीचे पत्रान्वये तहसिलदार, राहाता यांचेकडे धनाकर्षाद्वारे भरणा केलेली स्वामित्वधनाची रक्कम. | ---- | ---- | ---- | ३९,१५,९८५/- |
| | यापूर्वी अदा केलेली रॉयल्टी रक्कम (ब): | | | | ४५,७७,६४३/- |
| | शासनाचे अधिसूचनेतील सुधारीत दरानुसार शिल्लक जमा करावयाची रक्कम (रु.) (ब-अ) | | | | ४५,८१,७०९/- |

तहसिलदार, राहाता महाराष्ट्र शासन यांचेकडे वर नमूद केलेप्रमाणे रु.४५,८१,७०९/- मात्र इतकी रक्कम भरणा करावयाची आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०६ अन्वये, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.

त्यानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा.उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये वर नमूद रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ कालावधीत करावयाचे नियोजीत सोयी-सुविधांपैकी शिर्डी व परिसरात साईभक्तांचे सुविधेकरीता वाहनतळे विकसीत करण्याचे काम ठेकेदार मे. एस. के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांना र.४,५२,८५,२७४/- (रॉयल्टी चार्जेससह) मात्र इतक्या रकमेस देण्यात आलेले होते. तथापी या कामाचे अंतिम बिल व रॉयल्टी चार्जेससह मिळून एकुण रक्कम र.२,८८,८५,४६६/- मात्र इतकी झालेली आहे. अशाप्रकारे सदर कामाचे अपेक्षित खर्चात रू.१,६३,९९,८०८/- मात्र इतकी बचत होत आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १७२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार शिर्डी (बिरेगांव रोड- पार्किंग नं.०८), रुई (पिंपळवाडी रोड-पार्किंग नं.०८) व नांदुर्खी रोड लगत (पार्किंग नं.१०) अशा एकुण ०३ अतिरीक्त पार्किंग विकसीत करणेत आलेल्या आहेत. सदर ०३ अतिरीक्त वाहनतळे विकसीत करण्याचे काम ठेकेदार मे. एस. के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांना एकूण रु.१८,१७,८१६/- (रॉयल्टी चार्जेससह) मात्र इतक्या रकमेस देण्यात आलेले होते. तथापी या कामाचे अंतिम बिल व रॉयल्टी चार्जेस (निविदा दरानुसार) मिळून एकुण रक्कम रु.१३,३०,०२७/- मात्र इतकी झालेली आहे. अशा प्रकारे सदर कामात रु.४,८७,७८९/- मात्र इतकी बचत होत आहे. ठेकेदार यांनी एकूण ३२३०.४० घनमिटर (११४१.४८ ब्रास) गौणखनिज वापरलेले आहे. त्यासाठी सुधारीत दराने एकुण रु.४,५६,५९२/- मात्र इतकी रॉयल्टी शासनास भरणे आवश्यक आहे.

वरिलप्रमाणे उपरोक्त ०७ वाहनतळांची गौणखनिज स्वामित्वधनाची सुधारीत दरानुसार होणारी फरकाची रक्कम रु.४५,८१,७०९/- व अतिरीक्त ०३ वाहनतळांसाठी वापरणेत आलेल्या गौणखनिज स्वामित्वधनाची सुधारीत दरानुसार होणारी रक्कम रु.४,५६,५९२/- अशी एकूण रक्कम (अतिरीक्त कर वगळून) रु.५०,३८,३०१/- मात्र इतकी होते. उपरोक्तप्रमाणे बचत होणा-या रकमेतून सदरची रक्कम अदा करता येईल. महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.११/०५/२०१५ मध्ये आयकर, विक्रीकर, भूपृष्ठ भाडे, जिल्हापरिषद सेस आकारणेबाबत कुठलाही उल्लेख दिसून येत नाही.

तसेच तहसिलदार, राहाता यांनी मागणी केलेप्रमाणे अतिरीक्त कर अदा करावयाचे झाल्यास खालील प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल.

| अ.नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | मुरुम ६४८०२.४३ घनमीटर (२२८९८.३८ ब्रास) रॉयल्टी दर रु.४००/- प्रती ब्रास | ९६,१५,९४४.०० |
| २ | आयकर- २% | १,९२,३१८.८८ |
| ३ | विक्रीकर- १०% | ९,६१,५९४.४० |
| ४ | भूपृष्ठ भाडे- ५% | ४,८०,७९७.२० |
| ५ | जिल्हा परिषद सेस- ५% | ४,८०,७९७.२० |
| | एकुण रुपये: | १,१७,३१,४५.६८ |
| | पुर्णांकीत रक्कम रुपये. | १,१७,३१,४५२.०० |
| | (-) शासनाकडे भरणा केलेली रॉयल्टी रक्कम- | ४५,७७,६४३.०० |
| | शिल्लक जमा करावयाची रॉयल्टी रक्कम रुपये- | ७१,५३,८०९.०० |

सदर रॉयल्टी रक्कम अदा करावयाचे कार्यपध्दतीबाबत सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

तरी रॉयल्टीचे एकुण रकमेवर वरील प्रमाणे आयकर, विक्रीकर, भूपृष्ठ भाडे व जिल्हापरिषद सेस यासह होणारी एकुण रक्कम रु.७१,५३,८०९/- मात्र अदा करणे अथवा फक्त रॉयल्टीची निव्वळ रक्कम रु.५०,३८,३०१/- मात्र इतकी तहसिलदार, राहाता यांना अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीमध्ये वाहनतळे विकसीत करणेकामी वापरणेत आलेल्या गौणखनिज स्वामित्वधनाची सुधारीत दरानुसार होणारी फरकाची रक्कम अदा करावयाचे कार्यपध्दतीबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच गौण खनिज बुक ॲडजेसमेंट बुक बाबत माहिती व सदरहू कामाचे ठेकेदार यांचेबरोबर झालेल्या कराराच्या अटी/ शर्ती तपासून पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२४ **माहिती तंत्रज्ञान विभागाच्या डेटा सेंटर हॉलमध्ये जिप्सन पार्टीशन तयार करुन मिळणेबाबत..**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग करणे, अशी तदतूद आहे .

**प्रस्तावना:** माहिती तंत्रज्ञान विभागासाठी श्री साईप्रसादालय इमारतीचे उत्तर बाजूस पहिल्या मजल्यावर जिप्सन पार्टीशन टाकून केबीन्स तयार करुन देणेत आलेल्या आहेत. उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये माहिती तंत्रज्ञान विभागाने जुने मटेरियल ठेवणेसाठी रुमची व्यवस्था नसल्याने त्यासाठी पुर्वीप्रमाणेच जिप्सन पार्टीशन टाकून दरवाजासह केबीन तयार करुन मिळणेबाबत आय.टी. विभागाने जा.नं.एसएसएसटी/आयटी/१६३/२०१५ दि.०७/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव-** त्यानुसार माहिती तंत्रज्ञान विभागास स्टोअर रुम बनविणेसाठी जिप्सन पार्टीशन टाकून केबीन तयार करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे .

| Sr.No. | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Gypsum Partition | 318 | Sqft. | 145/- Per Sqft. | 46110.00 |
| 2. | Flesh door with vision panel | 2 | Nos | 7050/- | 14,100.00 |
| 3 | Luster paint to walls | 636 | Sqft. | 14.50 | 9222.00 |
| 4 | Plywood door frame | 2 | Nos | 2000/- | 4000.00 |
| | | | | **Total -** | **73,432.00** |

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.७३,४३२ -/मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या डेटा सेंटर हॉलमध्ये जिप्सन पार्टीशन तयार करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७३,४३२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.२५ **मौजे माळीण ता.आंबेगाव, पुणे येथे अतिवृष्टीमूळे गावावर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनामधील दुर्घटनग्रस्त व्यक्तींचे पूर्नवसन करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.जिल्हाधिकारी पुणे, यांचे जा.क्र.पगस/कावि/१५७५/२०१५, दि.०३.१०.२१५ चे पत्रात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

दि.३०.०७.२०१५ रोजी मौजे माळीण गांवावर अतिवृष्टीमुळे दरड कोसळून भिषण आपत्तीमध्ये ४० कुटुंबे उध्वस्त व १५१ माणसे मयत झालेली आहेत. माळीण गांवाचे पुनर्वसन करणेसाठी मौजे आंबड येथील जागा निश्चित करण्यात आलेली आहे. तज्ञ व्यक्तींच्या सुचनेनूसार आराखडा तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये पायाभुत सुविधा निर्माण करणे व एकूण ८० घरे बांधणे याबाबींचा समावेश आहे. एक घरासाठी रु.६,५०,०००/- इतका खर्च असून ८० घरांसाठी एकूण रु. ५ कोटी २० लाख खर्च येणार आहे. यामध्ये प्रत्येक घरासाठी रु. २ लाख याप्रमाणे ८० घरासाठी रु.१ कोटी ६० लाख निधी शासन देणार असून उर्वरीत रु. ३ कोटी ६० लाख निधी कमी पडत आहे. त्यासाठी आपण देत असलेल्या आर्थिक मदतीची माहीती या कार्यालयास कळवावी. जेणे करुन त्याचा उपयोग माळीण गांवाचे पुनर्वसनासाठी करता येणे श्यक्य होईल, असे त्यांचे पत्रात नमुद केले आहे.

अशाप्रकारे संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे:-

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसूथा शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय,

दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्ट्या विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६/११/२०१२ मध्ये अ.नं. 6 मधील (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन मा.व्य.स. निर्णय क्र.८६२/ दि.०८.११.२०१२ अन्वये रु.१० लाख किंवा त्यापुढील खर्चासाठी मा.व्य.स. च्या पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच बीले पारीत करणेत यावीत, असा ठराव संमत झाला आहे.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ व रु.१० लाखांचे पुढील खर्चाबाबत मा.व्य.स.चा निर्णय यास अनुसरुन मा.जिल्हाधिकारी पुणे, यांचा मौजे माळीण गांवाचा पुनर्वसनाचा साधारणता रु.३ कोटी ६० लाख खर्चाच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास, विहीत पध्दतीने सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मान्यता घेण्यात येईल.

तरी सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी मौजे माळीण ता.आंबेगाव, पुणे येथे अतिवृष्टीमूळे गावावर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनामधील दुर्घटनग्रस्त व्यक्तींचे पूर्नवसन करणेकामी संस्थानकडे निधीची मागणी केलेली आहे. परंतु विधी व न्याय विभागाच्या मान्यतेशिवाय निधी देता येणार नाही करीता त्यांनी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्तावित निधीची मागणी करावी, असे कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- लेखाशाखा विभाग-अनुदान)

---

विषय नं.२६ **सन २०१५ वर्ल्ड चॅम्पीयनशीप स्पर्धेकरीता अमेरिका सन सलवाडोर येथे जाणे-येणे व इतर कामी आर्थिक मदत मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.नारायण रावसाहेब पाडेकर,वर्ग-४ कर्मचारी, संरक्षण विभाग यांनी दि.१७.१०.२०१५.चे पत्रात, दि.१०.१२.२०१५ ते १४.१२.२०१५ या कालावधीत अमेरिका येथे होणा-या मि. वर्ल्ड चॅम्पीयनशिप स्पर्धेकरीता भारतातून या स्पर्धेसाठी माझी निवड झालेली आहे. या स्पर्धेकरीता जाणे-येणे व इतर खर्चासाठी रु.२ लाख खर्च येणार आहे. माझी घरची परीस्थिती हलाखीची असल्यामुळे मला सदरचा खर्च करणे शक्य नाही. तरी मला रु.२ लाख इतकी रक्कम आर्थिक मदत म्हणून मिळावी, असे त्यांनी नमुद केले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे :-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

वैयक्तीक करीता आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतुद नाही. तथापी मागील व्यवस्थापन समितीच्या कार्यकाळात सन २००६ व सन २००९ मध्ये खालील वैयक्तीक प्रस्तावांना शासनाचे मान्यतेने अनुदान देणेत आलेले आहे.

१) कु.शितल महाजन,पुणे यांना पॅराशुट जम्पसाठी रु.१० लाख.

२) श्री.आप्पासाहेब ढुस,राहुरी यांना स्काय डायव्हिंग खेळाचे प्रशिक्षण साहित्य खरेदीसाठी रु.७.५ लाख.

३) चि.शार्दुल व शाल्मली गागरे, राहुरी यांना बुध्दीबळ खेळाचे प्रशिक्षणासाठी रु.६ लाख.

उपरोक्त वैयक्तीक प्रस्तावांना अनुदान देणे करीता "विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी कलम १७ (२) (ण) मधील तरतुदीअन्वये एक विशेषबाब म्हणुन मान्यता दिलेली होती." शासनाचे मान्यतेनंतर संबंधीतांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

तरी श्री.नारायण रावसाहेब पाडेकर, वर्ग-४ कर्मचारी यांना अमेरिका येथे होणा-या मि. वर्ल्ड चॅम्पीयनशिप स्पर्धेकरीता येणे-जाणे व इतर खर्चासाठी रु.२ लाख आर्थिक मदत देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास सदर प्रस्ताव विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी सादर करता येईल.

सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६१० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.नारायण रावसाहेब पाडेकर, वर्ग-४ कर्मचारी यांना अमेरिका येथे होणा-या मि. वर्ल्ड चॅम्पीयनशिप स्पर्धेकरीता येणे-जाणे व इतर खर्चासाठी रु.२ लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी विधी व न्याय विभाग, मंत्रालय , मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही- लेखाशाखा विभाग-अनुदान)

---

विषय नं.२७ **दुर्मिळ, मौल्यवान व मानवी आरोग्यासाठी उपयुक्त अशा औषधी वनस्पतींचे उद्यान करणेबाबत.**

प्रस्ताव- उपरोक्त संदर्भीय विषयान्वये लोकोपयोगी आयुर्वेद प्रा. लि. पुणे, यांचे आवक नं. 14743 दि.23/10/2015 रोजीच्या पत्रानुसार कळविलेले आहे की दुर्मिळ,मौल्यवान व मानवी आरोग्यासाठी उपयुक्त अशा औषधी वनस्पतींचे

विविध प्रकारचे उपक्रम संस्थानमध्ये राबविणेबाबत परवानगी मागीतलेली आहे. तसेच त्यांनी मंदिराभोवती भरपुर प्रमाणात ऑक्सिजन व मौल्यवान वायुची निर्मीती करणाऱ्या दुर्मीळ, मौल्यवान औषधी वनस्पतींद्वारे ऑक्सीजन पार्कची उभारणी करणेसाठी औषधी वनस्पतींच्या 20 इंच व 24 इंच फायबरच्या एकुण 200 नग कुंड्या संस्थानला मोफत देणार असलेबाबत कळविलेले आहे.

तसेच भाविकांना राहण्यासाठी रजिस्ट्रेशन करावयाच्या हॉलचे समोरील परिसरात, साई धाम हॉल, साई प्रसादलयातील जेवणाचा हॉल समोर इ. ठिकाणी ठेवण्यासाठी दुर्मिळ,मौल्यवान औषधी वनस्पतींची हर्बल गार्डन (16 इंच साईजच्या मजबुत फायबर कुंड्या) ह्या शुल्क आकारुन देणार असलेबाबत कळविलेले आहे. तसेच सदरच्या फायबर कुंड्यावर त्यांची संपुर्ण माहिती फलकासहीत असलेबाबत कळविलेले आहे.

तसेच साई मंदिरासमोरील रस्त्याच्या दुभाजकामध्ये हरितवेली, रंगेबीरंगी फुले, आर्कषक झुडपे इ. मानवी आरोग्यावर उपयुक्त अशा दुर्मिळ व मौल्यवान, सुशोभीत व मनमोहक औषधी वनस्पतींची लागवड करणेकामी सुचविलेले आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थानच्या जमीनीमध्ये आयुर्वेद-आरोग्य-आध्यात्मिक-पर्यटन केंद्रची शास्त्रीय पध्दतीने उभारणी करता येईल यासाठी एकुण 5 एकर क्षेत्राची आवश्यक्ता असणार आहे. यामध्ये आयुर्वेद-शास्त्र, वनस्पतीशास्त्र, ज्योतीषशास्त्र इ. आधारीत 42 प्रकारच्या शास्त्रीय थिमची पर्यटन केंद्रसाठी निवड करण्यात येऊन सदर प्रकल्प राबविणेसाठी एकुण 8,09,100/- (आठ लाख नऊ हजार शंभर) मात्र खर्च येणार असलेबाबत कळविलेले आहे.

तरी लोकोपयोगी आयुर्वेद प्रा.लि.पुणे यांचा प्रस्ताव वनऔषधी रोपांची लागवडीचा आहे. त्यांनी सुचविल्याप्रमाणे निवासस्थाने, प्रसादलय, या ठिकाणी ठेवण्यात येणाऱ्या एका कुंड्याची किंमत 700 रुपये आहे व त्यावर त्यांची रोपांची माहिती व त्यांचे कंपनीचे नाव आहे. सध्या त्यांचेकडुन 200 नग कुंड्या देणगी स्वरुपात घेता येईल. तसेच संस्थानला वन औषधी गार्डन त्यांचेमार्फत व सल्यानुसार निर्मीती करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६११ **यावर सविस्तर चर्चाहोऊन, दुर्मिळ, मौल्यवान व मानवी आरोग्यासाठी उपयुक्त अशा औषधी वनस्पतींचे उद्यान करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

विषय नं.२८ **दोन प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेबाबत.**

प्रस्ताव- वाहन विभागाकडील प्रवासी बस क्र. एमएच-१७-टी-३३०१ व एमएच-१७-टी-३३०२ या बसेसचा वापर श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे ने-आण करणे कामी होत आहे. सदर बसेसच्या वार्षिक आर.टी.ओ. टॅक्सची मुदत दि.३०/११/२०१५ रोजी संपुष्टात येत असुन पुढील एक वर्षाचा टॅक्सची रक्कम भरणे आवश्यक आहे. मा. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचे नियमानुसार, खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरावी लागणार आहे. (दि.०१/१२/२०१५ ते दि.३०/११/२०१६ कालावधीसाठी)

| अ.नं. | बस क्रमांक | वाहन प्रकार | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-टी-३३०१ | प्रवासी बसेस | ५४,०००.०० |
| ०२ | एमएच-१७-टी-३३०२ | प्रवासी बसेस | ५४,०००.०० |
| | **एकुण रक्कम (रु.)** | | **१,०८,०००.००** |

उपरोक्त प्रमाणे दोन बसेस वाहनांचा आर.टी.ओ. कार्यलयात वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.१,०८,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख आठ हजार) मात्र खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल. सदर टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे ॲडव्हान्स डी.डी. आदा करावी लागणार आहे.

तरी बस क्र. एमएच-१७-टी-३३०१ व एमएच-१७-टी-३३०२ या दोन प्रवासी बसेसच्या वार्षिक टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात भरणेस व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.१,०८,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख आठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.६१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, बस क्र.एमएच-१७-टी- ३३०१ व एमएच-१७-टी- ३३०२ या दोन प्रवासी बसेसच्या वार्षिक टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात भरणेस व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.१,०८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

विषय नं.२९ **अभिलेख कक्षाकरीता नविन 4 नग स्प्लिट ए.सी. खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- अभिलेख कक्ष विभागामध्ये 'अ', 'ब' व 'क' वर्गवारीतील महत्वाची कागदपत्रे भविष्यातील उपयोगितेच्यादृष्टीने जतन करुन ठेवणेकामी शासनाचे नियमावलीप्रमाणे योग्य ते तापमान टिकवून ठेवणेकरीता दप्तर कक्षात 4 नग फ्लोअर माऊंटेड ए.सी. बसविण्यात आलेले आहेत.

अभिलेख कक्ष दप्तर ठेवण्यात आलेल्या कक्षातील 4 फ्लोअर माऊंटेड ए.सी. सन 2000 मध्ये खरेदी करुन बसविलेले आहेत. सततच्या वापराने व जुने असल्याने सदर ए.सी. चे वारंवार दुरुस्ती करावी लागत आहे. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी झाल्याने रेकॉर्ड ठेवणेकरीता शासनाचे नियमाप्रमाणे आवश्यक असलेले किमान 25 डि. से. तापमान मिळत नाही.

अभिलेख कक्षाकडील दिनांक 31/10/2015 रोजीचे मंजूर टिपणीन्वये दप्तर कक्षात बसविण्यात आलेले जुने ए.सी. बदलून त्या जागी माहीती व तंत्रज्ञान विभागामार्फत स्कॅनिंग मशीन येण्याच्या अगोदर नविन ए.सी. मेकॅनिकल विभागाकडून बसवून मिळणेसाठी मान्यता मिळालेली आहे. अभिलेख कक्षामध्ये नविन ए.सी. बसविणेकरीता इकडील विभागाकडे ए.सी. शिल्लक नसल्याने खालील तपशीलाप्रमाणे नविन ए.सी. खरेदी करणे आवश्यक आहे:

| अ.नं. | स्प्लिट ए.सी. तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | Split Type Wall Mounted Air Conditioner Capacity – 2 Ton, Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, & Copper Piping With Outdoor Unit, Extra M.S. Stand<br>Company – Voltas, Blue Star, Onida, LG | 4 नग | 55,000/- | 2,20,000/- |

उपरोक्तप्रमाणे अभिलेख कक्षासाठी 2 टन क्षमतेचे 4 नग स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी अंदाजे रुपये 2,20,000/- खर्च अपेक्षित आहे.

तरी अभिलेख कक्षातील महत्वाचे दप्तर जतन करणेकामी शासनाचे नियमावलीप्रमाणे योग्य ते तापमान टिकुन ठेवणेसाठी नविन 2 टन क्षमतेचे 4 नग स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 2,20,000/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अभिलेख कक्षातील महत्वाचे दप्तर जतन करणेकामी शासनाचे नियमावलीप्रमाणे योग्य ते तापमान टिकुन ठेवणेसाठी नविन २ टन क्षमतेचे ४ नग स्प्लिट ए.सी. विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,२०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

आयत्या वेळेचा विषय नं.०१ **संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने GOLD MONETISATION SCHEME मध्ये गुंतविणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानचे व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर २००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १४१ नुसार श्री साईबाबांच्या भक्तांकडून श्री साईबाबांना देणगी रुपाने सोने चांदीचे अलंकार वस्तू अर्पण केल्या जातात अशा देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या अलंकारांपैकी अपवादात्मक वस्तूमधील ज्या अत्युत्कृष्ट कलाकुसरीच्या व सदैव जतन करुन ठेवण्या योग्य वस्तू बाजूला ठेवून इतर वस्तू वितळविणेबाबत व श्री साईबाबांची पदके / नाणी तयार करुन ती भक्तांना उपलब्ध करुन देणे बाबतची कार्यपध्दती तयार करुन त्यास जा.नं.एसएसएस-वशी-लेखा-२२१३-२००५ दिनांक २८/०२/२००५ अन्वये शासन मान्यता मागीतली होती. यास अनुसरुन शासनाने शासन पत्र क्रं. सासंवि-२००५-४०७/(६४)- का सोळा दि ३१ मे २००७ चे पत्रान्वये शासनाने संस्थानला प्राप्त होणारे सोने-चांदी वितळवून त्यांचे नाणी बनवून ती बाजारभावाने विक्री करणेबाबतच्या कार्यपध्दतीस स्थायी मान्यता दिलेली आहे.

केद्र सरकारने प्रसिध्द केलेल्या GOLD MONETISATION SCHEME मध्ये शुध्द सोने गुतंविलेस त्यावर आकर्षक व्याजदर जाहिर केले आहेत. यामध्ये मध्यम व दिर्घ मुदतीसाठी हि योजना असून मध्यम मुदत ५ ते ७ वर्ष व दिर्घ मुदत १२ ते १५ वर्ष असून त्यावर अनूक्रमे २.२५ टक्के व २.२० टक्के असा व्याज दर जाहिर केलेला आहे.

संस्थानने या योजनेत गुतवणूक करावयाची ठरविल्यास भक्तांकडून मिळालेले सोने वस्तू प्रथम वितळवून त्योच शुध्द स्वरुपात रुपांतर करावे लागेल. संस्थानकडे सध्या ३१/०३/२०१५ अखेर निव्वळ वितळविण्या योग्य सोने वस्तु १२५ किलो आहेत. सदर सोने वस्तू शुध्द स्वरुपात रुपांतर करु नये याबाबत मा उच्च् न्यायालय मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद यांचे कडील सिव्हील ॲप्लीकेशन नंबर १२०५६ /२०१२ पी आय एल नं.१८/२०११ दिनांक १६/१०/२०१२. 6(e) Shall not Convert precious metals in any form nor melt it in any form. असा आदेश झालेला आहे.

आता संस्थानकडे देणगी रुपाने जमा असलेले सोने वस्तू १२५ किलो हे या योजनेत गुंतवावायचे ठरल्यास प्रथम ते शुध्द स्वरुपात रुपांतर करावे लागेल. त्यासाठी मा. उच्च न्यायालय याबाबत पुर्नविचार याचिका दाखल करावी लागेल. त्याच प्रमाणे मा उच्च् न्यायालयाच्या परवानगीनंतर त्यास महाराष्ट्र शासनाची मान्यता घेऊन शुध्द स्वरुपात प्राप्त झालेले सोने GOLD MONETISATION SCHEME मध्ये गुंतविता येईल.

तरी उपरोक्त उपलब्ध सोने वस्तु वितळवून शुध्द सोने GOLD MONETISATION SCHEME मध्ये गुंतवणूकीकामी मान्यता मिळणेकरीता सदरचा विष्य मा त्रिसदसीय समितीचे सभेपुढे ठेवणेस आपली मान्यता असावी.

निर्णय क्र.६१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयामध्ये यासंदर्भातील याचिका दाखल झालेली असल्यामुळे संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने **GOLD MONETISATION SCHEME** मध्ये गुंतविणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुगणालय पुणे यांना Neonatal Intensive Care Unit (NICU) देणेबाबत.**

प्रस्ताव- अधिष्ठाता, बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी जा.क्र.बीजेजीएमसी/डीन /१९/२०१५, दि.२३.११.२०१५ या पत्रान्वये, Neonatal Intensive Care Unit (NICU) ची मागणी केली आहे. सदर मशीन ससून जनरल हॉस्पिटल पुणे येथे रुग्णांना वैद्यकिय सेवा देण्यासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. सदर पत्रासोबत त्यांनी ३३ युनिटची तपशिलवार माहीती जोडली आहे. त्याची किंमत रु.७,३४,९०,०००/- इतकी दर्शविली आहे. ससून रुग्णालयामध्ये गोर-गरीब रुग्णांवर वैद्यकिय उपचार केले जातात व या ठिकाणी वार्षीक तपासण्यांची व वैद्यकीय उपचार घेणा-या रुग्णांची संख्या मोठयाप्रमाणावर आहे. त्यासाठी या मशीनची त्यांना आवश्यकता असल्याचे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमांत खालीलप्रमाणे तरतुद आहे:-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम २१ (१) (१क) "भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वेस्थानक, व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायांभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडाळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६/११/२०१२ मध्ये अ.नं. 6 मधील (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन मा.व्य.स. निर्णय क्र.८६२/ दि.०८.११.२०१२ अन्वये रु.१० लाख किंवा त्यापुढील खर्चासाठी मा.व्य.स. च्या पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच बीले पारीत करणेत यावीत, असा ठराव संमत झाला आहे.

या अगोदर बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांचा रु.२,४१,२५,०००/- किंमतीचे डिजीटल रोडिओग्राफी एक्स-रे मशीन मागणीचा प्रस्ताव दि.२९.११.२०१५ चे मा.त्रिसदस्यिय समितीचे सभेपूढे सादर केलेला आहे. त्याचा निर्णय कार्यवाहीसाठी येणे बाकी आहे.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ व रु.१० लाखांचे पुढील खर्चाबाबत मा.व्य.स.चा निर्णय यास अनुसरुन बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांना रु.७,३४,९०,०००/- किंमतीचे ३३ युनिट द्यावयाचे असल्यास विहीत पध्दतीने सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल.

तरी सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदी, मा.उच्च न्यायालयामधील पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ तसेच रु.१० लाखांचे पुढील खर्चाची समितीला असलेली मर्यादा या सर्व बाबींचा विचार करता बी.जे.वैद्यकिय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांना Neonatal Intensive Care Unit (NICU) देणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- लेखाशाखा, अनुदान विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **राजीव गांधी सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, दापोली, जिल्हा रत्नागिरी यांना सी.टी.स्कॅन युनिट सुरु करणेसाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

प्रस्ताव- अध्यक्ष,राजीव गांधी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, दापोली,जिल्हा-रत्नागिरी यांनी दि.०५.११.२०१५ चे पत्रान्वये, "विद्या वैभव शिक्षण मंडळाचे, दापोली होमिओपॅथिक मेडीकल कॉलेजने दापोली येथे सुमारे १० कोटी खर्च करुन सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल दि.०२ फेब्रुवारी २०१५ पासून सरु केलेले आहे. रुग्णालयात डिजीटल एक्स -रे, ऑपरेशन थिटर, आय.सी.यु., नेत्रविभाग, फिजिओथेरपी इत्यादी रुग्णांना आवश्यक असलेले विभाग सुरु केलेले आहे. तसेच रुग्णांसाठी खोल्या, स्पेशल रुम, जनरल वॉर्ड, अशी सुमारे ४० रुग्णांची सोय केलेली आहे. यासाठी बॅंकेकडून रु.४.५० कोटी कर्ज घेतलेले आहे. आता रुग्णालयात रुग्णांसाठी सी.टी.स्कॅन युनिट सरु करावयाचा आहे. यासाठी सी.टी.स्कॅन मशीन खरेदीसाठी आर्थिक मदत मिळावी," असे नमुद केलेले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे :-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१) (१क) "भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वेस्थानक, व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायांभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडाळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्ट्या विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६/११/२०१२ मध्ये अ.नं. 6 मधील (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन मा.व्य.स. निर्णय क्र.८६२/ दि.०८.११.२०१२ अन्वये रु.१० लाख किंवा त्यापुढील खर्चासाठी मा.व्य.स. च्या पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच बीले पारीत करणेत यावीत, असा ठराव संमत झाला आहे.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ व रु.१० लाखांचे पुढील खर्चाबाबत मा.व्य.स.चा निर्णय यास अनुसरुन राजीव गांधी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, दापोली यांना सी.टी.स्कॅन मशीन खरेदीसाठी आर्थिक मदत द्यावयाचे असल्यास विहीत पध्दतीने सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल.

सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर

निर्णय क्र.६१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ मधील तरतुदी, मा.उच्च न्यायालयामधील पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ तसेच रु.१० लाखांचे पुढील खर्चाची समितीला असलेली मर्यादा या सर्व बाबींचा विचार करता राजीव गांधी सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, दापोली, जिल्हा रत्नागिरी यांना सी.टी.स्कॅन युनिट सुरु करणेसाठी आर्थिक मदत मिळणेबाबतची विनंती अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- लेखाशाखा, अनुदान विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **ग्रामपंचायत देर्डे चांदवड, ता.कोपरगाव, जि.अ.नगर यांना सार्वजनिक शौचालय व स्नानगृह बांधुन देणेबाबत.**

प्रस्ताव- सरपंच, ग्रामपंचायत देर्डे चांदवड, ता.कोपरगांव, जिल्हा- अहमदनगर यांचे दि.०२.१२.२०१५ चे पत्रात, "देर्डे चांदवड हे गांव शिर्डी-लासलगांव रोडवर असुन शिर्डी पासून १५ किमी अंतरावर आहे. गेल्या पाच-सहा वर्षापासून दिवाळीनंतर व रामनवमीच्या काळात गुजरात वरुन श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीला पायी साईभक्त येत असतात. यामध्ये पुरुष व स्रिया मिळुन साधारण ५०० ते ७०० साईभक्त असतात. गांवामध्ये मोठे मारुती मंदिर असून त्यासमोर ५०X६० फुटाचा सभामंडप आहे. भोवती मोठे पटांगण आहे. गुजरात वरुन येणा-या दिंडया या ठिकाणी चहा, नास्ता,

जेवण, मुक्काम यासाठी थांबत असतात. मुक्कामासाठी असलेले साईभक्त अंधारात परीसरात शौचासला बसतात. त्यामुळे येथे दुर्गंधी सुटते व परीसर अस्वच्छ होतो. यात महीला साईभक्तांची कुचंबना होते. मुक्कामासाठी असलेल्या साईभक्तांना शौचालय व स्नानगृहांची व्यवस्था ग्रामपंचायत करु शकत नसल्यामुळे ग्रामपंचायतीस याठिकाणी १५ शौचालये व ५ स्नानगृहे बांधुन द्यावे," असे पत्रात नमुद केलेले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे:-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१) (१क) "भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वेस्थानक, व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायांभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडाळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६/११/२०१२ मध्ये अ.नं. 6 मधील (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन मा.व्य.स. निर्णय क्र.८६२/ दि.०८.११.२०१२ अन्वये रु.१० लाख किंवा त्यापुढील खर्चासाठी मा.व्य.स. च्या पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच बीले पारीत करणेत यावीत, असा ठराव संमत झाला आहे.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ व रु.१० लाखांचे पुढील खर्चाबाबत मा.व्य.स.चा निर्णय यास अनुसरुन सरपंच, ग्रामपंचायत देर्डे चांदवड, ता.कोपरगांव, जिल्हा- अहमदनगर यांना साईभक्तांच्या सोयीसाठी ग्रामपंचायतीस याठिकाणी १५ शौचालये व ५ स्नानगृहे बांधुन द्यावयाचे असल्यास सविस्तर खर्चाचा तपशिल तयार करुन विहीत पध्दतीने सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल.

सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, देर्डे चांदवड येथे पालखी थांबा आहे का व किती पालख्या थांबतात, याची संस्थान प्रतिनिधींनी समक्ष पहाणी करावी व पालखी थांबा असेल तरच पालखीतील पदयात्रींच्या सोयीसाठी ग्रामपंचायत देर्डे चांदवड, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना १५ सार्वजनिक शौचालय व ०५ स्नानगृहे बांधुन देणेबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा. सदर सार्वजनिक शौचालय व स्नानगृहे बांधून दिलेनंतर त्यांच्या साफ-सफाईची जबाबदारी ग्रामपंचायत देर्डे चांदवड यांचेकडे सोपविण्यात यावी.** (कार्यवाही- अनुदान विभाग, लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०५ **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

निर्णय क्र.६१८ **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

(१) सन- २०१७ पासून श्री साईबाबांची महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असुन त्यानिमित्ताने साईभक्तांना स्व:ताचे इच्छेनुसार देणगी देण्यासाठी स्टेट बँक आफ इंडिया, शाखा-शिर्डी या राष्ट्रीयकृत बँकेमध्ये महासमाधी शताब्दीसाठी स्वतंत्र बचत खाते उघडणेत यावे.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

(२) दि.२८/१२/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकडील सर्व वैद्यकीय अधिका-यांच्या अडीअडचणीबाबत मा.अध्यक्ष व जिल्हाधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात यावी.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

(३) संस्थानमध्ये सध्या एकूण चालू स्थितीत असलेली वाहने, बंद स्थितीत असलेली वाहने व त्यांचा भरण्यात येणारा विमा, टॅक्स, त्यांचे झालेले एकूण किलो मिटर याचा आढावा घेण्यात यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

(४) श्री.प्रकाश बोत्रे, मुख्य विश्वस्त, श्री नामदेव शिंपी समाज मंदिर, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे यांनी त्यांचे दि.१९/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये सासवड येथील नामदेव मंदिराच्या (बहुउद्देशीय समाज मंदिर) पुनःनिर्माण करणे कामी आर्थिक मदत मिळणेबाबत केलेली विनंती संस्थानचे उद्दीष्टात बसत नसल्याने तसेच मा.उच्च न्यायालयांतील पीआयएल क्र.१८/२०११, दि.१६.११.२०१२ मधील कायदेशीर बाबींचा विचार करता अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा, अनुदान विभाग)

---

वरील निर्णय क्र.५८५ ते ६१८ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**